cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–१२१ गुरूवार दि.२२ ऑगस्ट २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### संतापाचा कडेलोट होणारच

हा देश जगात सर्वात अग्रेसर संस्कृती संवर्धन, परंपरा जतन करणारा आणि संपूर्ण जगासमोर आदर्श निर्माण करणारा म्हणून सुप्रसिद्ध आहे. अशा या देशात महिलांवर होणारे अत्याचार ऐकून मन सुन्न होते. कोलकाता येथील हे प्रकरण ताजे असतानाच महाराष्ट्रात मुंबईजवळ बदलापूर येथे १३ ऑगस्ट रोजी दोन छोट्या कोवळ्या चार वर्षाच्या बालिकांवर शाळेच्या एका कर्मचाऱ्याकडून झालेल्या अत्याचाराने आणखीन एक जोरदार हादरा बसला. आपण जगासमोर, या देशातील सुजाण नागरिकांसमोर काय निर्माण करीत आहोत, असा प्रश्न आपल्यासमोर पडतोय. देशातील महिलांवर सध्या होत असलेले अत्याचार पाहिल्यानंतर शिसारी येते आणि संताप निर्माण होतोय.

### चंपई सोरेन नवा पक्ष स्थापन करण्याच्या तयारीत

रांची : झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी नवा पक्ष स्थापन करण्याची तयारी सुरु केली आहे. तसंच आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये कोणाशी युती करायची याचे संकेतही त्यांनी दिले आहेत. सत्ताधारी झारखंड मुक्ती मोर्चाचे प्रमुख मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याशी मतभेद झाल्याने त्यांनी वेगळी चूल मांडण्याचा निर्णय घेतला आहे. चंपाई सोरेन यांनी म्हटले की, माझ्यासमोर तीन पर्याय आहेत. यामध्ये निवृत्ती, संघटना किंवा मैत्री यांचा समावेश आहे. मी पक्षाची ताकद वाढवण्यासाठी प्रयत्न करेन, तसेच जर मला चांगला मित्र मिळाला तर मी त्या मित्रासोबत पुढे जाईन पत्रकारांशी बोलताना त्यांनी नव्या पक्षाबाबत ही भूमिका मांडली तसेच भविष्यातील युतीबाबतही संकेत दिले.

# राज्यातील कृषी विकासासाठी भरीव मदत करू

## केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहाण यांची ग्वाही; राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे थाटात उद्घाटन, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती

• नवीन दोन योजनांचा प्रारंभ तर सन्मान कृषी योजनेचा चौथा हप्ता कळ दाबून शेतकऱ्यांच्या खात्यात

**परळी । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील सरकार सध्या अनेक भव्य दिव्य आणि लोकोपयोगी योजना सातत्याने राबवत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लाडकी बहीण योजना ही तळागाळातील नागरिकापर्यंत पोहोचणारी योजना आहे. राज्यातील कृषी प्रश्नांसंबंधी आपण बसून चर्चा करू आणि महाराष्ट्र राज्याला पुढे नेण्यासाठी शक्य ती मदत मी करेन, अशी ग्वाही देशाचे केंद्रीय कृषिमंत्री आणि मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहाण यांनी येथे दिली.**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे बुधवार २१ ऑगस्ट पासून बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला असून, यांच्या उद्घाटन प्रसंगी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान बोलत होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, अजित पवार, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषी मंत्री धनंजय मुंडे, पान २ वर








### महोत्सवाला राज्यभरातून उपस्थिती...

या कृषी महोत्सवात भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन त्याचबरोबर राज्यभरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शक कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी महोत्सात सहभागी झालेल्या महाराष्ट्र शासन अंतर्गत राहुरी, अकोला, परभणी, कोकण कृषी विद्यापीठ दापोली इत्यादी कृषी विषयक आणि बीज संवर्धनाबद्दल माहिती देणारे स्टॉल, अनेक संस्था, महिला बचत गट, स्वयंसहायता गट, आदींचे मोठे स्टॉल या ठिकाणी उभारण्यात आले आहेत. कृषी महोत्सवाच्या निमित्ताने राज्यातील कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, अनेक जिल्ह्यातील कृषी अधिकारी, महसूल विभाग, आरोग्य विभाग यांची वर्दळ परळी शहरात दिसून येत आहे. शेतकऱ्यांना लाभदायक ठरतील अशा अनेक माहिती पूर्ण योजना या कृषी महोत्सवातून शेतकरी बांधवांना मिळणार आहेत.

### तगडा पोलीस बंदोबस्त आणि खासगी बाऊन्सरचे दर्शन

या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने शहरात मोठा बंदोबस्त लावण्यात आला होता. एसपी, अॅडिशनल एसपी, ४ डीवायएसपी, १० पीआय, ४५ एपीआय, पीएसआय, ५७० पोलीस कर्मचारी, १०० महिला पोलीस कर्मचारी, आरसीपीच्या ४ प्लाटून, १ बॉम्बशोधक पथक, १ श्वान पथक, असा बंदोबस्त लावण्यात आला होता. शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची निगराणी ही एकूणच दिवसभरातील घडामोडीवर होती.

## प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरणची स्थापना

### खासदार उदयनराजे भोसले असणार अध्यक्ष



**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र सरकारने बुधवारी मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरणची स्थापना केली आहे. भाजपचे खासदार उदयनराजे भोसले हे प्राधिकरणचे अध्यक्ष असणार आहेत. तसेच प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरणावर सह-अध्यक्ष म्हणून साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई आणि विशेष निमंत्रित सदस्य म्हणून विजय नायडू यांचा देखील समावेश करण्यात आला आहे. राज्य सरकारकडून याबाबतचा अधिकृत निर्णय जारी करण्यात आला आहे.**

प्रतापगड किल्लाचे बांधकाम १६५६ साली छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदेशावरुन करण्यात आले होते. १० नोव्हेंबर १६५९ रोजी याच प्रतापगडाच्या पायथ्याशी छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाही सरदार अफजलखानाचा वध केला होता. ही एक इतिहासातील मोठी घटना आहे. अशा या ऐतिहासिक महत्त्व असलेल्या किल्ल्याच्या विकासासाठी प्राधिकरण तयार करण्यात आले आहे. या प्राधिकरणामध्ये पुण्याचे विभागीय आयुक्त साताऱ्याचे जिल्हाधिकारी, पुरातत्व पान २ वर

# महायुतीची एसआयटी म्हणजे कारवाईचा फार्स !

## बदलापूर प्रकरणी विजय वडेट्टीवार यांची टीका, काँग्रेसचा मंत्रालयावर धडक मोर्चा



**मुंबई । प्रतिनिधी**

**महायुती सरकार एसआयटी सरकार आहे. कोणतीही घटना झाली की लगेच एसआयटीची घोषणा सरकारकडून केली जाते. परंतु कारवाई केली जात नाही. महायुतीची एसआयटी म्हणजे कारवाईचा फार्स आहे, अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर टीका केली. त्याचबरोबर बदलापूर प्रकरणात एसआयटी नेमली तरी न्याय मिळेल का? असा संतप्त सवाल करत या प्रकरणी सरकारने उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक केल्याने या नियुक्तीवर विजय वडेट्टीवार यांनी आक्षेप घेतला.**

बदलापूर येथील चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ काँग्रेस पक्षाने मंत्रालयावर धडक मोर्चा काढला. पोलिसांनी मोर्चा अडविल्यानंतर महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ महायुती सरकार विरोधात आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. याप्रसंगी माध्यमांशी विजय वडेट्टीवार बोलत होते. यावेळी मुंबई काँग्रेस अध्यक्षा खासदार वर्षाताई गायकवाड, आमदार अस्लम शेख, काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत, काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. विजय वडेट्टीवार म्हणाले की, बदलापूर येथील शिक्षण संस्था पान २ वर

### आरोपीला ६ दिवसांची पोलिस कोठडी

याप्रकरणातील एक अपडेट समोर आले आहे. बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला २६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर आरोपीला कल्याण कोर्टात हजर करण्यात आले. यावेळी कोर्ट परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सरकारी वकील अश्विनी भामरे पाटील यांनी पीडितेची बाजू मांडली. विशेष महिला न्यायाधीश व्ही.ए. पत्रावळे यांच्या कोर्टात अक्षय शिंदे याला हजर केले.

### मविआकडून २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक

बदलापूर घटनेवरून विरोधक आक्रमक झाले आहेत. या घटनेच्या निषेधार्थ मविआकडून २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे. राज्यातील महिलांवरील अत्याचार, बलात्काराच्या घटना आणि सरकारवर असंवेदनशीलतेचा आरोप करत महाविकास आघाडीने महाराष्ट्र बंदची घोषणा केली आहे. या घटनेचे तीव्र पडसाद राज्यभर उमटत आहेत. महाविकास आघाडीच्या बैठकीनंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी याबाबत माहिती दिली. मित्रपक्षही बंदमध्ये सहभागी होणार असल्याचे पटोले यांनी म्हटले आहे.

### माझी सुरक्षा काढून घ्या–सुप्रिया सुळे

मुंबई : मागील काही दिवसांपासून राज्यात महिला अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. बदलापूर येथील घटनेने संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून टाकले आहे. दरम्यान, महिला सुरक्षेच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांना एक पत्र लिहले असून, या पत्रात त्यांनी माझी पोलीस सुरक्षा व्यवस्था तातडीने काढा, पान २ वर

### हवामान बदल मानवतेसाठी सर्वात मोठा धोका–उपराष्ट्रपती धनखड

मुंबई । प्रतिनिधी

हवामान बदल हा मानवतेसाठी सर्वात मोठा धोका आहे. यासाठी सर्व देशांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे. कारण पृथ्वीशिवाय मानवाला राहण्यासाठी दुसरा कोणताही ग्रह नाही, असे वक्तव्य उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केले. ते १९ व्या सीआयआय इंडिया–आफ्रिका बिझनेस कॉन्क्लेव्हमध्ये बोलत होते. उपराष्ट्रपती धनखड म्हणाले की, जगासाठी भारताचा सर्वसमावेशक दृष्टिकोन आहे. जागतिक स्थिरता आणि शांततेचा संदेश देण्यासाठी भारत विकासाच्या मार्गावर काम करत आहे. यावेळी बुरुंडी प्रजासत्ताकचे उपाध्यक्ष प्रॉस्पर बाझोम्बांजा, गांबिया प्रजासत्ताकचे उपाध्यक्ष मुहम्मद बी.एस. जॅलो, जेरेमिया कापन काँग, लायबेरिया प्रजासत्ताकचे उपाध्यक्ष, सीआयआयचे अध्यक्ष संजीव पुरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### सोनिया गांधी, राहुल गांधी पुढील महिन्यात महाराष्ट्र दौऱ्यावर



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, काँग्रेस नेते राहुल गांधी येत्या ५ सप्टेंबरला महाराष्ट्र दौऱ्यावर असणार आहेत. सांगली येथे स्व. पतंगराव कदम यांच्या पुतळ्याचे अनावरण या दोन्ही नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. माजी मंत्री विश्वजीत कदम यांच्या विशेष निमंत्रणावरून हे दोन्ही नेते सांगलीत येणार असल्याचे समजते. या कार्यक्रमाला शरद पवारांसह काँग्रेसचे बडे नेतेही उपस्थित असणार आहेत.**

मागील काही दिवसांपासून राहुल गांधींच्या महाराष्ट्र दौऱ्याच्या चर्चा सुरु होत्या. तो दौरा मुंबईत असेल असे बोलले जात होते. मात्र २० ऑगस्टला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे मुंबई दौऱ्यावर होते. पान २ वर

### अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून भरपाई द्या-आ.संदीप क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

**मतदारसंघातील बीड व शिरूर का. तालुक्यात मागील दोन दिवसात जवळपास सर्वच महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतातील पिकांचे, पशुधनाचे, घरांचे व गायगोठ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकर्यांना नुकसान भरपाई द्या अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासन आणि प्रशासनाकडे केली आहे.**

बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड तालुका आणि शिरूर का. तालुक्यात जवळपास सर्वच महसूल मंडळात दि.१९ आणि दि.२० रोजी अतिवृष्टी झाली आहे. या झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतातील ऊस, कापूस, सोयाबीन, मूग, बाजरी आदी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. यासोबतच पशुधनाची हानी, घरांचे व गायगोठ्यांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतातील उभे पीकांचे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदील झाला असून त्याला मदत करण्याची गरज आहे. त्यामुळे बीड मतदारसंघ तसेच जिल्हाभरात, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यासाठी मंडळ पान २ वर

### मंडळ अधिकारी सचिन सानपला एक लाखाची लाच घेताना पकडले

**बीड । प्रतिनिधी**

**अवैधरित्या केलेले उत्खनन कमी दाखवण्यासाठी मंडळ अधिकारी सचिन सानपला बुधवारी दि. २१ रोजी दुपारी एक लाख रूपयाची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. मोठा मासा गळाला लागल्याने जिल्ह्यात खळबळ माजली आहे.**

अवैधरित्या केलेले उत्खनन कमी दाखवण्यासाठी मंडळ अधिकारी सचिन सानपने दोन लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडी अंती दीड लाख रुपयांची लाच देण्याचे मान्य करण्यात आले. याबाबतची तक्रार आल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नियोजन केले. पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.०० क्विंटल | २,३०० | २,६३५ | २,४६८ |
| ज्वारी/हायब्रिड :५९.५० क्विंटल | २,१३१ | २,६०१ | २,३२० |
| मूग :१.५० क्विंटल | ७,७०० | ७,७०० | ७,७०० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,७०१ | ७,७०१ | ७,७०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,४७१ | ३,३९० | २,७५० |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ३१.०० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: ८.०० क्विंटल | ६,५८० | ६,५८० | ६,५८० |

# हमीभावासाठी २५० शेतकरी संघटना करणार आंदोलन

## शेतकरी संघटनांची दिल्लीत बैठक, राजू शेट्टी यांचीही उपस्थिती

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**देशातील २५० हून अधिक शेतकरी संघटना गॅरंटी किसान मोर्चाच्या माध्यमातून किमान हमीभाव व संपुर्ण कर्जमुक्तीसाठी निर्णायक आंदोलन करणार आहेत. २५ राज्यातून आलेल्या २५० हून अधिक शेतकरी संघटनांची दिल्लीत बैठक पार पडली. या बैठकिला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांचीही उपस्थिती होती.**

दिल्ली येथील रकाबगंज गुरूव्दार येथे केंद्र सरकारने किमान हमीभावाचा कायदा पारित करावा या मागणीसाठी पुन्हा एकदा देशभरातील शेतकरी संघटनांनी एल्गार पुकारला आहे. भारत देश हा कृषीप्रधान आहे. मात्र, देशातील शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झालेली आहे. केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्या वाढू लागल्या आहेत. २०११ मध्ये तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली हमीभावाच्या अभ्यासासाठी समिती गठीत केलेली होती. त्यावेळेस नरेंद्र मोदी यांच्या समितीने हमीभावाचा कायदा पारित करण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार ११ वर्षापासून सत्तेत असताना किमान हमीभावाच्या कायद्यासाठी केंद्र सरकार दुर्लक्ष करू लागले आहे. देशभरातील शेतकरी हमीभावापेक्षा कमी दराने सोयाबीन, कापूस, हरभरा, तूर, मक्काभात विकू लागला आहे यामुळे देशातील शेतकरी सर्वाधिक कर्जबाजारी झाला आहे. यावर्षी केंद्र सरकारचे कोणतेही नियंत्रण राहिले नसल्याचे या बैठकीत सांगण्यात आले. शेतकऱ्यांना शाश्वत हमीभाव मिळू लागल्यास देशातील पान २ वर

### हरियाणा विधानसभा निवडणूक लढवणार

सरकारने हमीभाव कायद्यावर योग्य पावले उचलली नाही. तर हरियाणातील शेतकरी संघटना विधानसभा निवडणूक लढणार असल्याचे या बैठकीत ठरले आहे. या निवडणुकीतून जनमत शेतकरी संघटनेसोबत किती आहे? याची चाचपणी केली जाईल, असे राजू शेट्टी म्हणाले.



cmyk

## अग्रलेख

# संतापाचा कडेलोट होणारच

हा देश जगात सर्वात अग्रेसर संस्कृती संवर्धन, परंपरा जतन करणारा आणि संपूर्ण जगासमोर आदर्श निर्माण करणारा म्हणून सुप्रसिद्ध आहे. अशा या देशात महिलांवर होणारे अत्याचार ऐकून मन सुन्न होते. कोलकाता येथील हे प्रकरण ताजे असतानाच महाराष्ट्रात मुंबईजवळ बदलापूर येथे १३ ऑगस्ट रोजी दोन छोट्या कोवळ्या चार वर्षाच्या बालिकांवर शाळेच्या एका कर्मचाऱ्याकडून झालेल्या अत्याचाराने आणखीन एक जोरदार हादरा बसला. आपण जगासमोर, या देशातील सुजाण नागरिकांसमोर काय निर्माण करीत आहोत, असा प्रश्न आपल्यासमोर पडतोय. देशातील महिलांवर सध्या होत असलेले अत्याचार पाहिल्यानंतर शिसारी येते आणि संताप निर्माण होतोय.

देशात कोलकाता येथील घटनेने आपल्या भारतीय संस्कृतीला हरताळ फासला गेला. कोलकाता येथील ज्या डॉक्टर महिलेवर ज्या पद्धतीचे अत्याचार करण्यात आले त्यातून आपल्याला आपण भारतीय आहोत याची लाज वाटावी, असा हा अत्याचार आहे. अनेकांच्या शरिरात अत्याचाराची बीजे पेरली जात आहेत आणि त्यातून हे अत्याचारी राक्षस निर्माण होत आहेत. कोलकाता येथील प्रकार आणि १३ ऑगस्ट रोजी बदलापूर येथे झालेल्या दोन चिमुरड्यांवरील अत्याचार हे सर्व प्रकार अत्यंत घृणास्पद आहेत आणि निषेधाचे कोणत्याही स्तरावरचे शब्द वापरले तरी ते कमीच पडतील. बदलापूर येथील घटनेने त्या भागात मंगळवारी तमाम बदलापूरमधील जनतेने त्या आदर्श शिक्षण संस्थेवर जोरदार हल्ला चढवला. रेल्वेस्थानक बंद पाडले. हजारोंच्या संख्येने नागरिक शाळेवर चाल करून गेले. रस्ते बंद केले आणि शाळेला आग लावण्यापर्यंत नागरिकांनी कायदा हातात घेतला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दोन्ही नेत्यांनी जनतेची समजूत घालण्याचा आटोकाट प्रयत्न केला. तत्पूर्वी त्यांनी शाळेच्या मुख्याध्यापिकेला निलंबित केले. संबंधित शाळेच्या मुलांची जबाबदारी पाहणाऱ्या दोन सेविकांना सेवेतून कमी केले. संबंधित परिसरातील पोलीस निरीक्षकाची तात्काळ बदली देखील केली. संबंधित संस्थाचालकांवर कडक कारवाईचे आदेशही दिले. एवढे करून न राहता फडणवीस यांनी हे प्रकरण द्रुतगती न्यायालयात उभे करून संबंधित व्यक्तीविऊद्ध होईल तेवढी कडक कारवाई केली जाईल, असे जाहीर केले. तरीदेखील बदलापूरची जनता संबंधित व्यक्तींचा बदला घेण्याचा आग्रह धरीत होती. एकंदरीत या देशात महिलांवर होणारे वाढते अत्याचार थांबण्याचे नाव घेत नाही हे लक्षात आल्यानंतर आता यानंतर महिलांवर अत्याचार करणाऱ्या व्यक्तीविऊद्ध अरब राष्ट्रांमध्ये जशी कडक शिक्षा दिली जाते तशीच कडक शिक्षा देण्याची तरतूद भारताला देखील यानंतर करावी लागेल असे दिसते. पश्चिम बंगालमध्ये गेले आठ दिवस लैंगिक अत्याचाराविरोधात मोर्चे, आंदोलने, जाळपोळ, दगडफेक, अश्रुधुरांच्या नळकांड्या वगैरे अत्यंत स्फोटक वातावरण निर्माण झाले आहे. शेवटी हे प्रकरण गंभीर स्वरूपाचे आहे याची जाग न्यायालयांना देखील आली आणि न्यायालयाने हे प्रकरण गंभीर पद्धतीने हाताळण्यास प्रारंभ केलेला आहे. असे असले तरी अशी प्रकरणे यानंतर घडू नयेत आणि ज्यांनी हे अत्याचार केलेले आहेत त्यांना एवढी कडक शिक्षा झाली पाहिजे की ही शिक्षा पाहून यानंतर कोणालाही स्त्रियांवर अत्याचार करण्याचे धाडस होऊ नये. जो कोणी धाडस करील तो आपल्या प्राणास मुकणार, एवढेच त्या व्यक्तीच्या ध्यानात येणे गरजेचे आहे. त्यासाठीच होतील तेवढी कडक प्रावधाने भारतीय महिला संरक्षण कायद्यात निर्माण करणे आवश्यक आहे. संपूर्ण देशाला, देशाच्या संस्कृतीला, देशाच्या तत्त्वांना काळीमा फासणाऱ्या या नराधमांना आयुष्यभर पश्चाताप होईल अशा पद्धतीची शिक्षा तीदेखील सार्वजनिकरित्या होणे आवश्यक आहे. बंगालमधील घटनेमध्ये जे काही झाले आहे त्या संदर्भात दुर्दैवी महिलेचा शवविच्छेदन अहवाल हाती आल्यानंतर एकापेक्षा एक थरकाप उडवणाऱ्या बाबी उघड होत आहेत. त्यामुळे अशा नराधमाला केवळ आयुष्यभर तुरूंगात ठेवून नव्हे तर होईल तेवढे अत्याचार त्या व्यक्तीवर करून त्याला संपविणे आवश्यक ठरेल. त्याला केवळ भारतातच नव्हे या पृथ्वीवर जगण्याचा अधिकार मुळीच असू नये. बदलापूर येथील घटनेमध्ये शाळेच्या सफाई कर्मचाऱ्याने ज्या चिमुरड्या बालिकांवर अत्याचार केले त्यासही अशाच पद्धतीची कडक शिक्षा व्हावी. बिघडत चाललेली आजची पिढी आणि त्यातून होत असलेले अत्याचार, दुराचार याचे मुख्य कारण म्हणजे संस्काराचा अभाव आहे. देशात आपण आपल्याच संस्कार पद्धतीवर हसतो, आपले संस्कार हाच एक टीकेचा विषय बनतोय, मात्र आपल्या संस्कृतीने असा दुराचार करायला आपल्याला कधीही शिकवलेले नाही. संस्कारापासून नवीन पिढी दूर जाते आणि विदेशी संस्कार तसेच भ्रमणध्वनीद्वारे लैंगिक अत्याचाराच्या व्हिडिओ क्लिप्स यातून काहीजणांना मिळणारी प्रेरणा इथूनच बिघडत्या वातावरणास प्रारंभ होतो आणि त्यातून अत्याचार, गुन्हेगारीचे प्रमाण वाढते. ते रोखण्यासाठी जोपर्यंत कडक शिक्षेची तरतूद होत नाही तोपर्यंत कायद्याचा धाक उपयोगी पडत नाही.

# महिला डॉक्टरवर अत्याचार व खून प्रकरणी कॅण्डल मोर्चा



**अंबड । प्रतिनिधी**

**कलकत्ता येथील महिला डॉक्टर वर अत्याचार व खून प्रकरणी अंबड डॉक्टर असोसिएशन कॅण्डल मार्च काढण्यात आला.**

याप्रसंगी डॉ.योगेश ढेंबरे, डॉ. राहुल बागुल, डॉ.राजेंद्र भाला, डॉ भरत होंडे,संतोष पवार, डॉ. अरुण मुकणे, डॉ. गोपाळ अडाणी, डॉ.गलांडे, डॉ. दुधाळ, डॉ. पाईकराव, डॉ.राऊत, डॉ. नवल गट्टानी, डॉ. सारडा,डॉ. रमेश राठोड, डॉ. दीपक उगले, डॉ.अनिकेत उगले, डॉ. बद्री पुंड, डॉ. भारत ठोके, डॉ. ससाने, डॉ. विश्वास शिंगारे, डॉ. गीता शिंगारे, डॉ. सारडा मॅडम, डॉ. ऋतुजा ढेंबरे, डॉ. कल्पना पाईकराव, डॉ. पार्वती उगले, डॉ. बाला मॅडम, डॉ. कुलकर्णी मॅडम, लाहोटी मॅडम, डॉ. मुकणे मॅडम, सौ संजीवनी धांडे, पवन करियर अकॅडमी चे सुरेश जगताप,शिकारे सर, वानखेडे सर, प्रवीण वराडे विकी शेवाळे दिनेश सातपुते यांच्यासह अनेकांची मोर्चा मध्ये मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मागासवर्गीय वार्डात घाणीचे साम्राज्य

## बॅनरवर चपलांचा हार लाऊन केज नगरपंचायत व यश कन्स्ट्रक्शनचा केला निषेध!

**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायतची सत्ता जनविकास परिवर्तन आघाडी व कॉंग्रेस मिळुन स्थापन झालेली आहे . जनविकास परिवर्तन आघाडीचे हारुण इनामदार हे केज शहरामध्ये भाजपाचे काम मागील ०९ वर्षा पासून पाहतात . यावेळी लोकसभेला देखील निवडणुकीचे शहरातील कामकाज त्यांनीच पाहिले होते.मागील न.प केजच्या निवडणुकीत शहरातील वार्ड क्रमाक ७ मधुन कपिल मस्के तसेच विमल जोगदंड यांचा पराभव करून सौ. सिता बनसोड या मोठया मताधिक्याने निवडणून आल्या आणि नगराध्यक्ष पदावर विराजमान झाल्या. परंतु नगराध्यक्ष पदाचा प्रत्यक्षात कारभार मात्र हारुन इनामदार हेच पाहत असल्याची चर्चा शहारातील जनेतेकडून ऐकावयास मिळत आहे. तसेच केज विधानसभेच्या भाजपाच्या आमदार सौ. नमिता मुंदडा या मागासवर्गीय समाजातून येतात तसेच नगराध्यक्षा सौ.सिता बनसोड या देखील मागासवर्गीय समाजाच्या आहेत मात्र मागासवर्गीय वार्डाचा तसेच केज शहरातील विकासासाठी त्या उदासिन असताना पहावयास मिळत आहेत.




याबाबत सविस्तर वृत्त असे केज शहरात एकुण १७ वार्ड आहेत त्यापैकी वार्ड क्र. ७,९ व १६ मागासवर्गीय वार्ड म्हणून आरक्षीत आहेत. परंतु सदरील वार्डात घाणीचे साम्राज्य तसेच सत्ताधाऱ्यांची विकासासाठी उदासीनता दिसून येत आहे. त्यापैकी वार्ड क्र.१६ मध्ये नगरसेविका सौ. पल्लवी ओंमप्रकाश राजणकर या मोठया मताधिक्याने निवडणुन आल्या होत्या त्या निवडून आल्या मात्र त्यांना सत्ताधारी कसल्याच प्रकारे विश्वासात न घेता तथा मागासवर्गीय वस्तीत निधी न देता तसेच स्वच्छतेच्या संदर्भाने वार्डातील कामे सांगितले असता सत्ताधारी उदासिनता दाखवत असल्यामुळे वार्डात सर्वदूर दुर्गंधी , घाणीचे साम्राज्य परसले असल्याची प्रतिक्रिया दैनिक वादळ वार्ताच्या प्रतिनिधीशी बोलतांना त्यांनी दिली आहे. मात्र सदरील वार्ड क्र.१६ च्या समस्या डोके वरती काढत असल्यामुळे याकडे कॉंग्रेसचे शहराध्यक्ष ताहेर खुरेशी यांनी प्रशासनास तथा सत्ताधाऱ्यास जागे करण्यासाठी आगळे-वेगळे अंदोलन उभे केले आहे. चक्क घाणीच्या व दुर्गंधीयुक्त ठिकाणी एक बॅनर लावले असुन त्यावर केज नगरपंचायत व यश कन्स्ट्रक्शन यांची नावे लिहुन या नावावर चंपालाचा हार घातला आहे. या अनोख्या पद्धतीने लावलेल्या बॅनरची चर्चा शहरात सर्वदुर होताना दिसत आहे. सदरील लावलेल्या बॅनरमुळे केज नगरपंचायतचे सत्ताधारी तथा विरोधक जागे होतील का ? मागासवर्गीय वस्तीला न्याय मिळेल का ? नगसेविका सौ. पल्लवी ओंमप्रकाश राजणकर यांच्या मागासवर्गीय वस्तीतील कामे होतील का ? आदि प्रश्न शहरातील जनतेला पडली आहेत.

# विवेक हा जीवनाचा तिसरा डोळा ठरतो-पु.अमृत ऋषी महाराज

**बीड । प्रतिनिधी**

**आपले जीवन जर सुरक्षित आणि संस्कारित ठेवायचे असेल; पवित्र आणि शुद्ध राखायचे असेल तर त्यावर सम्यक नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता पडते असे नियंत्रण तर अनेक प्रकारच्या वर्तणातुन दिसून येते. मात्र या सर्व नियंत्रणांमध्ये चार प्रकारच्या नियंत्रणाचा अभ्यास करणे हे योग्य वाटते. हे चातुर्मास पर्वकालीन प्रवचनात बोलताना अमृत ऋषी महाराज म्हणाले.**

डोळ्यात असणारे लज्जेचे नियंत्रण, वाणीद्वारे घडणारे संस्काराचे नियंत्रण, मनावर प्रतीबिंबीत होणारे विवेकाचे नियंत्रण आणि जीवनावरील उमटणार्या संयमाचं नियंत्रण. हे आपल्या जीवनात असणे गरजेचे आहे. यातील मनावरील विवेकाचे नियंत्रण यावर बोलताना ते म्हणतात मनाचा मोठेपणा वाणीतून संस्काराविषयी घडणारा मधुरपणा आणि कायाद्वारे परोपकारी अशा विनम्रतेची भावना यातूनच निर्माण होते ती विवेकाची धारणा. विवेक असणारा जीव विनम्र बनतो आणि तोच आपल्या जीवनाचा उद्धार करू शकतो .असा विवेक हा जीवनाचा तिसरा डोळा ठरू शकतो. हा डोळा अशा दृष्टीतून पाहतो. त्याच्या प्रकाशात त्याला केवळ सत्य असत्य समजले जाते. योग्य अयोग्याचा विचार केला जातो. विवेक रुपी नेत्र ज्यावेळी उघडतो त्यावेळी जीवनाच्या अंतर्गत पुण्याचा साठा होतो. आणि पापाचा क्षय होतो. विवेक हा जरुरी आहे .हा अंतर्गत जीवातील मन, वचन ,कायाद्वारे घडलेल्या अनंत पापाचे नाशाला विवेकच कामी येतो . आणि पापाला प्रतिबंध करण्याचे अर्थात संवर कार्य साधतो. त्यावेळी पाप घालवण्याचा क्षण सानिध्यात येतो. आणि विवेक रुपी नेत्राचा डोळा उघडतो. विवेकाला शोधले जाते. कारण विवेक हा धर्म असतो जसा पाण्यामध्ये जिवंतपणा असतो आणि असे जिवंत पाणी हे स्वतः चे अस्तित्व दाखवते त्याप्रमाणे परमेश्वर सांगतात धर्म हाच विवेक आणि विवेक हाच धर्म दोन्हीही एकाच नाण्याच्या दोन बाजू आत्मा सुप्त अवस्थेत जातो. त्यावेळी अनुचित घडते. शांतता भंग होते. विवेक्? लुप्त पावतो. संघर्षातून संग्राम घडतो. आणि या संग्रामातून जीवन विस्कळीत होते. अशावेळी नतमस्तकतेतून केलेले वंदन जीवनाला सन्मान मिळवण्याचा प्रयत्न करते. मन वचन कायावर विवेक ठेवण्यासाठी प्रयत्नशील असते . हा राग द्वोषाचे मुक्त करणारा



वित्तरागी बनवतो. विवेक हे शुद्धतेचे प्रतीक आहे तर अविवेक अशुद्ध शूद्रतेचे लक्षण आहे. जे पाप अवतरण्यासाठी सहाय्यकारी ठरते .अर्थात आश्रवाच्या रूपातून विवेकाला ताण पडतो मात्र यावेळी समोर जे घडते त्यातून सिद्धी मिळते गज सुखमाल या कुमाराला स्मशानामध्ये अशाच पापाच्या प्रतिबंधातून सिद्धता प्राप्त झाली. विवेकाचा डोळा उघडला तर अश्रव मधून संवर घटित झाल्याशिवाय राहत नाही. आणि संवरच्या स्थानावर असे अश्रव घटीत होतात यासाठी पुण्यार्जनाला समवशरण तीर्थक्षेत्र महत्त्वाचे ठरते समवशरण एक महत्त्वाचे क्षेत्र असते जे की पुण्याचं उपार्जन करण्याचं स्थान असते ते. समवशरण सौभाग्याला परमभाग्य बनवण्याचं साधन ठरते. अर्जुन शालीनतेतुन महायुद्धातही वीरोधी गटात त्यांच्या शिबिरात जाऊन ज्येष्ठांना गुरुवर्या सहित जाऊन प्रणाम करत असे. नंतरच त्या दिवसाच्या युद्धाला समाप्ती होत असे हे केवळ शालीनता आणि विवेकाचे लक्षण होते. हे समजावण्यासाठी त्याला श्रीकृष्णाची साथ होती. ज्याला परमेश्वराची साथ मिळते त्याचा विजय निश्चित असतो. कारण हा सत्य नैतिकता व धार्मिकतेवर आपले वर्चस्व गाजवतो. तर अनैतिकतेने असणारी संपत्ती जिचा माणसाला अभिमान असतो व अशा संपत्तीच्या आणि दुराचारी लोकांच्या जीवावर विजय मिळवणे दूरापास्त्? ठरते. त्यातच त्यांचा नाश होतो हे महाभारतातील कौरव पांडवाच्या युद्धातून दिसून येते. ज्या ठिकाणी विवेक जागृत होतो त्या ठिकाणी संवराचे स्थान निश्चित होते. आणि आश्रवाच्या कर्म बंधन करते. विवेकाच्या माध्यमातून घराला स्वर्गात रूपांतर केले जाते .आणि जीवनाला विवेकातून शुद्ध केले जाते. नामस्मरणाची जपाची माळ फिरल्याने पापाचा नाश होतो पाप हे ३२ प्रकारातून दोषी ठरते ते १० मनातून १० वचनातून आणि १२ कायाच्या माध्यमातून पाप अवतरत असते .आपण आराधना केली तर चंचलता हटवून स्थिरता कायम. संवर अशाच स्थानी असतात चातुर्मासात विकार पतन होतात येथे येऊन सर विवेकाचा तिसरा डोळा उघडला नाही तर हा जीव असत्यवादी मिथ्यात्वाचा वाटतो. आणि हे जे कार्य करतो तो मिथ्यात्वी नसून साम्य कतेचा भोक्ता ठरतो. नास्तिक वादी ही आराधना करतात मात्र ते परमेश्वराच्या सानिध्यात जातात परंतु मोक्ष मिळवीत नाहीत ,यासाठी जीवनात विवेक असायला हवा, विवेक हा विद्वान आहे किंतू ना परंतु ही त्याची दृष्टी नाही. ही त्याची ओळखण्याची वृत्ती आहे समवशरणाच्या ठिकाणी सहज सौभाग्य दर्शन मिळते म्हणूनच आपण चांगल्या कुळात जन्मलो हे आपले भाग्य आहे .परमात्म्याचे डोळे लिनतेने कायम झुकलेली असतात. परमात्म्याचा चरित्र संसारी जीव कमळाप्रमाणे अलिप्त असतो असा जीव विवेकाचा विचार करत असतो आणि याच जीवाचा प्राणी हा विवेकवादी असतो याचे त्यांनी लक्ष्मणावरून उदाहरण दिले सीता मातेचे अपहरण झाल्यानंतर हे दोन्ही भाऊ तिच्या शोधात फिरत असतात. अशावेळी हनुमंताची आणि या दोघा बंधूंची चित्रकूट पर्वतावर गाठ पडते. त्यावेळी हनुमंताकडे जटायुनी दिलेले सीतामाईचे काही अलंकार दागिने असतात ते सीता मातेचे आहेत का? हे ओळखण्यासाठी श्रीराम प्रभू पुढे ते दागिने ठेवले जातात. आणि लक्ष्मणाला विचारले जाते या दागिन्यातून आपण हे सीता मातेचे दागिने आहेत का याची ओळख पटवावी. यावर लक्ष्मणजी पूर्ण दागिने पाहतात आणि त्यातून केवळ पायातील नुपूर चैन ओळखतात आणि सांगतात मी जेष्ठ वहीणी ही माते समान असते अशा मातेचे मी दर्शन घेत असताना हे नुपूरच माझ्या दृष्टीस पडत होते. हे मातेचे आहेत यावरून लक्ष्मणाच्या अंगी असणारी शालीनता विवेकता आणि नतमस्तकथा दिसून येते जो दैनंदिन सानिध्यात असूनही मातेच्या रूपाकडे नाही तर केवळ चरणाकडे पाहत असतो असे त्यांनी विवेकाची वर्णन केले.

## पान १वरून...

### राज्यातील कृषी विकासासाठी

पंकजा मुंडे, कृषी मूल्य आयोगाचे पाशा पटेल आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नवीन दोन योजनांचा प्रारंभ परळी शहरातून करण्यात आला तर सन्मान कृषी योजनेचा चौथा हप्ता कळ दाबून शेतकऱ्यांच्या खात्यात यावेळी जमा करण्यात आला. यावेळी हिंदीतून भाषण करताना केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी राज्य सरकारचे कौतुक केले. महाराष्ट्राचे कृषी क्षेत्रामध्ये मोठे योगदान असल्याचे सांगत त्यांनी देशातील कृषी क्षेत्राच्या विकासाचा वेध घेतला. महाराष्ट्राला कृषीमध्ये सगळ्या प्रकारची मदत केंद्राकडून दिली जाईल. राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकार सक्षम असून, शेतकरी हिताच्या योजना राबविण्यासाठी सर्वाधीक प्राधान्य दिले जात असल्याचे चौहान म्हणाले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पटीने वाढविण्यासाठी महायुतीच्या राज्यातील सरकारला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखालील केंद्र सरकार मदत करेल. तसेच राहुल गांधी व शरद पवार यांनी फक्त बोलण्याचे काम केले, जनतेला काही दिले नसल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आवाज दिला आणि मी या कार्यक्रमाला आलो असा उल्लेख केंद्रीय कृषीमंत्र्यांनी यावेळी केला. या प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे म्हणाले की, मला शेतकऱ्यांसाठी काही मागायचे आहे, म्हणूनच मी केंद्रीय कृषिमंत्र्याच्या अगोदर त्यांना विनंती करून बोलण्यास उभा राहिलो आहे. या कृषी महोत्सवात शेतकऱ्यांना आधुनिक तंत्र, पारंपारिक शेती, सेंद्रिय शेती आणि तज्ञांचे मार्गदर्शन येथे मिळणार आहे. आमचे सरकार शेतकऱ्यांच्या व्यथा जाणणारे सरकार आहे म्हणूनच आम्ही लाडका शेतकरी योजनेचे २००० आजच खात्यावर जमा करत आहोत. इथून पुढे शेतकऱ्यांना वीज बील भरण्याची गरज नाही आम्ही त्यांचे बीन माफ करत आहोत असेही शिंदे म्हणाले. राज्यामध्ये लाडकी बहीण, लाडका भाऊ या योजना नंतर लाडका शेतकरी ही योजना प्रारंभ करत असून त्याचे दोन हजार रुपये आजच बळीराजा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहेत असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याप्रसंगी म्हणाले. यावेळी उप मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस म्हणाले, आम्ही आजच परळी येथून रुपये सहा हजाराचा सन्मान निधीचा चौथा हप्ता मुख्यमंत्र्याच्या हस्ते वितरित करत आहोत. मागील काळात सोयाबीनचा भाव पडल्यामुळे कापूस आणि सोयाबीनचे पैसे देण्याची सुरूवातही आम्ही परळीतून करत आहोत. मराठवाडा हा तसा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो त्यामुळेच पावसाचे वाहून जाणारे ५० टीएमसी पाणी मराठवाड्यात आणणार आहोत. ही योजनाही पूर्णत्वास जात आहे. मागील काळात आमच्या सरकारने अकरा हजार ७२६ कोटी रुपये कर्जाच्या अनेक प्रकल्पाला मान्यता दिली असून, ११ सिंचन प्रकल्पांना १३००० कोटी रुपये दिले आहेत मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पा मुळे आता शेतकऱ्याला ३६५ दिवस वीज मिळणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, महायुतीचे संपूर्ण शासन आज परळीत आले आहे. मी जेव्हा जेव्हा परळीत आलो तेव्हा येथील स्वागताचा उत्साह हा शेवटपर्यंत आढळतो. पण मला एक सांगावसे वाटेल की आजच्या शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून रॅली मधून या सभेस्थळी येताना चटके आणि फुलं असह्य झाले. आपण कार्यक्रमाच्या उत्साहाच्या भरात अधिक काही करायला जातो, काही करतो पण ते असह्य काही वेळा होते. आज बीड जिल्ह्यात या कृषी महोत्सवाच्या उद्घाटनानिमित्त आल्यामुळे जिल्ह्यातील सर्व देवी देवतांना साकडे घालतो की, महाविकास आघाडीस बळ दे. मला आठवते गोपीनाथ मुंडे एका जाहीर कार्यक्रमात बोलले होते की, मला कृषिमंत्री व्हायला आवडेल. पण आज त्यांचा पुतण्या कृषी मंत्री होऊन त्यांचे स्वप्न पूर्ण करतो आहे. महाराष्ट्र राज्याच्या अनेक योजना या देशभरात राबविल्या गेल्या. एकूणच आजच्या भव्य दिव्य अशा या कृषी महोत्सवाचे सर्व श्रेय धनंजय मुंडे आणि त्यांच्या सर्व टीमला जाते असेही आवर्जून अजित पवार म्हणाले. शहरातील नाथ रोडवरील च्या बाजूच्या कॉटन कॉटन यार्ड परिसरात हा महोत्सव होत असून, छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मान्यवरांची रॅली कार्यक्रम स्थळापर्यंत नेण्यात आली. यासाठी बँड पथक, लेझीम पथक, उच्चक्षमतेचे डीजे लावण्यात आले होते.

----------

### महायुतीची एसआयटी म्हणजे

एका पक्षाशी संबंधित आहे. त्याच पक्षाच्या सबंधित वकिलाची विशेष वकील म्हणून नेमणूक केली आहे. या वकिलाने निवडणूक लढविली असून उद्या हे प्रकरण दाबले गेले तर त्याला जबाबदार कोण? याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल. सरकार म्हणते विरोधक राजकारण करत आहेत. तुम्हाला लाज वाटत नाही का सरकार म्हणून? कोलकता इथे अत्याचाराच्या घटना झाल्यावर भाजपा आंदोलन करते तेव्हा राजकारण नसते का? आम्ही आंदोलन केले की राजकारण होते का? असा सवाल करत मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात अशा घटना घडत आहेत. मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात ५७% टक्के गुन्ह्यात वाढ झाली आहे. पण मुख्यमंत्र्यांचे त्याकडे लक्ष नसल्याचा आरोपही यावेळी त्यांनी केला. बदलापूरमधील दोन शाळकरी चिमुकल्यांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्राची मान देशात शरमेने खाली गेली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातच माता, भगिनी, चिमुकल्या व शाळेत मुलीही सुरक्षित राहिलेल्या नाहीत. बदलापूरच्या आधी शिळ फाट्याच्या मंदिरात गृहिणीवर तीन पुजाऱ्यांनी बलात्कार करुन हत्या केली. उरणमध्ये एका मुलीची हत्या करण्यात आली. बदलापूरच्या ज्या शाळेत हा प्रकार घडला त्या शाळेला वाचवणारी शक्ती कोणती असा सवाल मुंबई कॉंग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केला. १३ तारखेला घटना घडली असताना शाळा प्रशासनाने त्याची दखल का घेतली नाही. पोलीस स्टेशनमध्ये पीडित मुलीच्या गर्भवती आईला ११ तास ताटकळत का ठेवले, कोणाच्या दबावाखाली पोलीस काम करत होते. कोणाला वाचवण्याचा प्रयत्न होत होता ह्याचा खुलासा झाला पाहिजे. बदलापूरची जनता रस्त्यावर उतरली तेव्हा सरकार जागे झाले व थातूरमातूर कारवाई केली. निलंबनाची कारवाई करुन चालणार नाही या प्रकरणी बदलापूर पोलीस स्टेशनमधील संबंधित वरिष्ठ कनिष्ठ अधिकाऱ्यांना बडतर्फ करा. संबंधित शाळेला वाचवण्यासाठी कोणती शक्ती काम करत होती असा सवाल करून शाळा व्यवस्थानावरही कडक कारवाई केली पाहिजे अशी मागणी त्यानी केली.

--------------

### प्रतापगड किल्ला विकास

सर्वेक्षण विभागाचे प्रादेशिक संचालक, पुणे, पुरातत्व आणि वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे संचालक यांचा समावेश असेल.

----------

### अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ

अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायक यांना आदेशित करून झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावेत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकार्यांकडे केली आहे. तसेच शासनस्तरावरून शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्यात अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. याबाबत आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, महसूल मंत्री, विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे.

--------

### सोनिया गांधी, राहुल गांधी पुढील

दरम्यान, सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ५ सप्टेंबरला सोनिया गांधी आणि राहुल गांधी महाराष्ट्रात येत आहेत. या दौऱ्यात सोनिया गांधी आणि राहुल गांधींच्या उपस्थितीत सांगलीतील कडेगाव येथे कॉंग्रेसचे ज्येष्ठ दिवंगत नेते पतंगराव कदम यांच्या पुतळ्याचे अनावरण होणार आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार आणि राज्यातील कॉंग्रेसचे सर्व प्रमुख नेतेमंडळी देखील उपस्थित राहणार असल्याचे समजते. सांगलीचे खासदार विशाल पाटील हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित असणार आहेत. राज्यात होत असलेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी सांगली जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रात हे कॉंग्रेसचे मोठे शक्ती प्रदर्शन असण्याची शक्यता आहे.

------

### माझी सुरक्षा काढून

अशी विनंती केली आहे. सुप्रिया सुळे पुढे त्यांच्या पत्रात म्हणाल्या की, राज्यात कायदा सुव्यवस्था बिघडत चालली आहे. त्यामुळे पोलिसांवर प्रचंड तणाव येतो आहे. त्यातच राजकीय नेत्यांना पोलिस संरक्षण दिले जात आहे. त्यामुळे माझे पोलिस संरक्षण काढून ते जनतेच्या सेवेत द्यावे, अशी विनंती गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांनी केली आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, राज्यात प्रंचड गुन्हेगारी वाढली आहे, असे केंद्र सरकारचा डेटा सांगतोय. महिला अत्याचाराचा विषय खूप गंभीर होत आहे. जनता रस्त्यावर आल्यानंतर सरकारला जाग आली. शक्ती कायदा जो मविआच्या काळात आणला होता त्यांचे या सरकारने काय केले असा सवालही यावेळी त्यांनी उपस्थित केला.

----------

### हमीभावासाठी २५० शेतकरी

शेती अर्थव्यवस्था मजबूत होईल. अन्यथा गहू, साखर, तांदूळ निर्यात करणाऱ्या देशाला आता गहू आयात करण्याची वेळ आल्याने हेच शेतीविषयक धोरणांचे केंद्र सरकारचे अपयश आहे. यावेळी एम. एस. पी गॅरंटी किसान मोर्चाच्यावतीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व विरोधी पक्षनेता राहूल गांधी यांना हमीभावाच्या कायद्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला. या बैठकीस समन्वयक सरदार व्ही.एम. सिंग, राजाराम त्रिपाठी, चंद्रशेखर कुडेहाळी, आमदार यावर मीर, दयानंद पाटील यांचेसह देशभरातील विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

----------

### मंडळ अधिकारी सचिन सानपला एक

यातील पहिला हप्ता म्हणून एक लाख रुपयांची लाच घेताना बुधवारी (दि.२१) दुपारी बीड एसीबीने रंगेहाथ पकडले. ही कारवाई बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरातील तहसील कार्यालयाजवळील एका हॉटेलात करण्यात आली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या कारवाईने महसूल क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. २२ ऑगस्ट २०२४
३

## स्टार हेल्थ इन्शुरन्समध्ये उत्तम कामगिरी केल्याबद्दल पवळ दाम्पत्याचा गुणगौरव




म्हसोबावाडी : आष्टी तालुक्यातील कडा येथील रहिवासी अविनाश सुनिल पवळ हे सलुनचा व्यवसाय करतात व त्यांची पत्नी मनिषा अविनाश पवळ या आपलं कुटुंब संभाळत आपल्या पतीला हातभार म्हणून स्टार हेल्थ इन्शुरन्स मध्ये कार्यरत झाल्या अन्? मनिषा पवळ व अविनाश पवळ हे दोंघे ही एक जीव होऊन स्टार हेल्थ इन्शुरन्स परिवारात काम करतं हेल्थ इन्शुरन्स पॉलिसीचे महत्त्व सर्वांना पटवून सांगत उत्तम रित्या काम केले अन्? याचेच फळ म्हणून या पवळ दाम्पत्याला स्टार हेल्थ इन्शुरन्स कंपनीकडून कौतुकाची थाप देऊन त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांचा सिल्व्हर ट्रॉफी देऊन गुणगौरव करण्यात आला या शुभप्रसंगी नितीन धामणे(सिनियर सेल्स मॅनेजर), रणजीत उजागरे (एरिया मॅनेजर) सह विक्रांत कायगावकर उपस्थित होते कलियुगात खर्च बचेत करताना नक्की आपल्या कुटुंबाची एक हेल्थ इन्शुरन्स असावा असे अविनाश पवळ यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# दोन समाजिक उपक्रम राबवत मयूर आंधळेंच्या होमपिचवर आरोग्यदूतांचा अभिष्टचिंतन सोहळा

## विकासाचा कायापलट पाहून शेटे देखील भरावून गेले ; ३५० लोकांना आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड वाटप

वडवणी । प्रतिनिधी

आयुष्यमान भारत या केंद्र सरकारच्या योजनेचे राज्य प्रमुख डॉं. ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त रुई गांवचे युवा उच्चशिक्षित सरपंच मयुरशेठ आंधळे यांच्या पुढाकाराने गांवात समाजिक उपक्रम राबवत आंधळे कुंटुबियाच्या जन्मभूमी असर्णाय़ा होमपिचवर आरोग्यदूतांचा वाढदिवस दोन समाजिक उपक्रम राबवत शानदार साजरा करण्यात आला आहे. तर आरोग्यदूतांनी सुध्दा गांवचा विकासात्मक बदल पाहून सरपंच मयुरशेठ आंधळे यांचे कौतुक करत शब्बासकिची थाप दिली आहे.

बीड जिल्ह्याचे भुमिपूत्र तथा केंद्र शासनाच्या आयुष्यमान भारत याविभागाचे राज्य प्रमुख डॉं. ओमप्रकाश शेटे यांचा स्वातंत्र दिनी म्हणजे १५ ऑंगस्ट रोजी वाढदिवस होता. यानिमित्त वडवणी तालुक्यातील मौजे रुई गांव याठिकाणी माजी आ. केशवदादा आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली गांवचे युवा उच्चशिक्षित तरुण सरपंच मयुरशेठ आंधळे यांच्या पुढाकाराने गांवातील तब्बल ३५० ग्रामस्थाचे आयुष्यमान भारत या केंद्र शासनाच्या आरोग्य क्षेत्राशी निगडीत ऑंनलाईन अर्ज करत कॉंर्ड काढले असून या कार्डचे वितरण तसेच गांवतील २०० शेतकर्य़ांना उत्कृष्ठ अशा २०० केशर आंबा या फळाचे झाड दिले या दोन्ही समाजिक उपक्रमाचा वितरण सोहळा आरोग्यदूत डॉं. ओमप्रकाश शेटे व माजी आ. केशवदादा आंधळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला असून या कार्यक्रमाला संपादक बंडूजी खांडेकर, वडवणी मार्केट कमिटी जेष्ट संचालक पांडुरंग बापु आंडील, रणजित भैया धस, रुईचे माजी सरपंच शंकरराव आंधळे, संगम गावचे सरपंच भगवान कांदे, खडकी गावाचे सरपंच अशोक चोले, साळिंबा गावाचे सरपंच दिनेश नाईकवाडे, कान्हापूर-मामला गांवचे सरपंच उतरेश्वर खाताळ, शेटे साहेबांचे स्वीय सह्यायक अशोक दोडतले, ग्रामविकास आधिकारी अंकुश राख, वडवणी तालुका आयुष्मान भारतचे प्रमुख डॉ. सिद्धेश्वर आळणे, रुई गांवच्या प्रथम नागरिक तथा सरपंच सौ. छायाताई आंधळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यामध्ये सर्वप्रथम डॉं. ओमप्रकाश शेटे व माजी आ. केशवदादा आंधळे गांवात दाखल होताच सरपंच मयुरशेठ आंधळे यांच्यासह ग्रामस्थांच्या वतीने सत्कार केला यानंतर ढोलताशाच्या गजरात आराध्यदैवत श्री. हनुमान मंदिरापर्यत मिरवणुक काढली. याठिकाणी आराध्यदैवताच्या चरणी मान्यवरांनी श्रीफळ फोडून कार्यक्रमाला सुरुवात झाली यावेळी आरोग्यदूत डॉं. शेटे यांनी शासकिय हुद्यावरुन समाजिक क्षेत्रातील आणि विशेष आरोग्य क्षेत्रात करत असलेल्या कामाचा उपस्थिताना अवलोकन केले तर केंद्र सरकारने देखील आयुष्यमान भारत योजनेवर खूप मोठा खर्च करत असून गोरगरीब जनतेला यांचा फायदा होत आहे. असे सांगितले तर माजी आ. आंधळे भाषणात म्हणाले कि, माझी जन्मभूमी आणि कर्मभूमि देखील रुईच आहे. याच गांवाचे राजकिय धडे देत राज्याच्या विधिमंडळाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली सोबत स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे देखील खूप मोठे उपकार आणि साहकार्य राहिले आहे. गांवच्या विकासाठी सर्वपरी मदत केली आणि अजून हि करणार असून ते माझे कर्तव्य आहे. अशी यावेळी भूमिका मांडली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सरपंच मयुरशेठ आंधळे करत आसताना म्हणाले आता पर्यत ३४ कामे मार्गी लावले आहेत. तर या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विष्णु आंधळे यांनी केले आहे. या कार्यक्रामातील गांवातील ग्रामस्थ व तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### २०० शेतकऱ्यांना केशर आंब्याच्या झाडाचे वाटप

### युवा सरपंच मयुर आंधळे यांचे कौतुक देखील केले रुई गांवात उत्साहात वाढदिवस साजरा

### सरपंच मयुर आंधळे सत्कारार्थी ठरले

रुई गांवची धुरा हाती घेतल्यापासून ते आजपर्यत तब्बल ३४ कामाचा योग्य आणि उत्कृष्ठ अशा निपटरा करत ते गांवाच्या सेवेसाठी कामे दाखल देखील केली आहेत. या कामाचे कौतुक करत शाब्बासकीची थाप तर दिलीच परंतु सदारील कार्यक्रमाचे शानदार आणि नेक व चोख नियोजन केल्यामुळे राज्यातील गोरगरीब जनतेचे आरोग्यदूत डॉं. ओमप्रकाश शेटे देखील भरावून गेले आणि कार्यक्रमातच माजी आ. केशवदादा आंधळे यांच्या उपस्थित उच्चशिक्षित युवा सरपंच मयुरशेठ आंधळे यांचा सत्कार करत डॉं. ओमप्रकाश शेटे यांनी एकप्रकारे पाठबळ दिले आहे.

# २५ ऑगस्ट रोजी वर्धा येथे बामसेफचे ३८ वे राज्य अधिवेशन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र बामसेफचे ३८ वे राज्य अधिवेशन या वर्षी वर्धा येथे रविवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२४ रोजी सरोज मंगलम, राष्ट्रमाता रोड, सानेवाडी येथे होत आहे. या महत्वपुर्ण अधिवेशनाचे अध्यक्ष बामसेफचे राष्ट्रीय अध्यक्ष वामनजी मेश्राम हे आहेत. तर या अधिवेशनाचे उद्घाटक नागपूर येथील संविधान तज्ज्ञ देविदास घोडेस्वार हे असतील. तरी बीड जिल्ह्यातील नागरिकांनी राज्य अधिवेशनास उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रीय मुलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे राज्य सचिव डॉ.मोहन मिसाळ व जिल्हाध्यक्ष आर.डी.वैरागे यांनी केले आहे.

सदरील अधिवेशनाची वेळ सकाळी ११ ते रात्री ९.३० पर्यंत असेल. हे अधिवेशन तीन सत्रात होणार आहे. या अधिवेशनात राष्ट्रीय, राज्य स्तरावरील ज्वलंत अशा विविध ८ विषयांवर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील २१ विद्वान,अभ्यासक वक्ते मार्गदर्शन करणार आहेत. याअधिवेशनात सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक बाबींवर वैचारिक मंथन होणार आहे. या तिनही सत्रांची अध्यक्षता वामनजी मेश्राम हे करतील. या अधिवेशात विशेष अतिथी म्हणुन दिनकर शास्त्री भुकेले महाराज (संस्थापक अध्यक्ष, हिमगिरी प्रतिष्ठान, पुणे), शशिकांत हिंगोणेकर (प्रसिध्द साहित्यिक तथा निवृत्त (शिक्षण) उपसंचालक, जळगाव), अशोक चोपले (सत्यशोधक चळवळीचे अभ्यासक, वर्धा) तर प्रमुख अतिथी म्हणून कुंदा तोडकर (राष्ट्रीय अध्यक्षा, रा.मु.महिला संघ, नवी दिल्ली), दीपक वासनिक (राष्ट्रीय समीक्षा, प्र.बामसेफ, नवी दिल्ली), डॉ.दयानंद गोगले (राष्ट्रीय संयोजक, आयएसएसएस, नवी दिल्ली), ऍड.राहुल मखरे (भिमा कोरेगाव चौकशी आयोग - वकील), ऍड.सुनिल डोंगरदिवे (राष्ट्रीय प्रभारी, राष्ट्रीय खिश्चन मोर्चा), बाबा हस्ते (राष्ट्रीय प्रभारी, नफ, नवी दिल्ली), डॉ.सुरेश पवार (राष्ट्रीय उपाध्यक्ष, आयएमपीए), इंजि.निशकांत जावरे (राष्ट्रीय महासचिव, आयईपीए) हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रितम प्रियदर्शी (संचालक, आवाज इंडिया टीवी, राष्ट्रीय निमंत्रक इंडिया अगेन्स्ट एवीएम.), ऍड.फिरदोस मिर्झा (सामाजिक विचारवंत, नागपुर), ऍड.स्मिता कांबळे (राष्ट्रीय समन्वयक, इंडिया अगेन्स्ट इव्हीएम फोरम), डॉ.राहुल भोईटे (भोईटे हॉस्पिटल, जवळगाव) हे सत्र पहिले - १) ईव्हीएमला रद्द करण्यात यावे. ईव्हीएम मानवाकडून किंवा एआय द्वारे हॅक होण्याची दाट शक्यता आहे. एलॉन मस्क यांचे विधान ईव्हीएमच्या द्वारे द्विदलीय, द्विदलीय संसदीय लोकतंत्राला पुन्हा स्थापित करणे आणि बहुजन समाजाला वास्तविक सत्तेपासून वंचित करणे हे शासक जातीचं एक षडयंत्र आहे - एक गंभीर चर्चा., २) संपूर्ण महाराष्ट्राचे प्रेरणास्थान पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हे बडवे ब्राह्मणांच्या हाती देण्यासाठी भाजपच्या डॉ.सुब्रमण्यम स्वामी यांनी मुंबई हायकोर्टात दाखल केलेली याचिका - एक गंभीर मंथन. तसेच सत्र दुसरे - १) २०१९ च्या निवडणुकीमध्ये बीजेपी द्वारे आणि २०२४ च्या निवडणुकी मध्ये कॉंग्रेस द्वारा ओबीसी जनगणनेचा मुद्दा उपस्थित करणे. हे केवळ ओबीसीचा निवडणुकी मध्ये वापर करण्याचा व फक्त आश्वासन देण्याचा मामला होता. एक गंभीर विचार मंथन., ३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शैक्षणिक धोरण नसून मनुस्मृतीचे आधुनिक रूप आहे. एक विश्लेषण या विषयावर आपले मौलिक विचार मांडणार आहेत. तरी बीड जिल्ह्यातील तमाम बहुजन बंधु व भगिनींनी या अधिवेशनास उपस्थित राहण्याचे आवाहन असे आवाहन बामसेफचे बीड जिल्हाध्यक्ष प्रा.सुमित वाघमारे व राष्ट्रीय मुलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे राज्य सचिव डॉ.मोहन मिसाळ व रामदास वैरागे यांनी केले आहे.



**वामन मेश्राम**
(राष्ट्रीय अध्यक्ष, बामसेफ, नवी दिल्ली)




**धारूर : बदलापूर येथे घडलेल्या घटनेतील आरोपीस कठोर शिक्षा देण्यात यावी असे निवेदन धारूर तहसीलदार यांना राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या वतीने देताना युवती काँग्रेस च्या पदाधिकारी**

# चर्मकार समाजासाठी स्वतंत्र संत रविदास संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करा -नानासाहेब घोडके

माजलगाव (प्रतिनिधी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन वं प्रशिक्षण संथा (बार्टी) मध्ये विषमता असल्यामुळे चर्मकार समाजासाठी स्वतंत्र संत रविदास संशोधन वं प्रशिक्षण संस्था स्थापन करावी जेणे करून समाज बांधवांना याचा मोठा लाभ होईल असे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उप मुख्यमंत्री अजित दादा पवार यांना काल दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे.



दि २१ ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने शिष्टमंडळाने माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या कार्यलयात जाऊन एक निवेदन दिले आहे यात म्हंटले आहे की () अनुसूचित जाती प्रवर्गातील ५९ जातीसाठी शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व संस्था प्रशिक्षण (बांटी) ची स्थापना केलेली आहे. परंतु त्या संस्थेत चर्मकार व त्यांच्या उपजातीत व लोकसंखेने मोठा असलेला समाजासाठी अपेक्षित प्रमाणात चर्मकार समाजातील मुलांना समान न्याय मिळत नाही तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन वं प्रशिक्षण संस्था (बार्टी) मध्ये चर्मकार समाजाच्या विध्यार्थ्यांना विषमतेतून पहिले जाते. तसेच बार्टी मध्ये आमच्या समाजातील चर्मकार मुलांना समान न्याय अपेक्षे नुसार मिळाला नाही आणी बार्टी मध्ये जी काही विषमता निर्माण झाली ती मातंग समाजाच्या नेते / कार्यकर्ते यांनी शासना समोर मांडली आहे. व शासनाने मातंग समाजासाठी आण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) ची स्थापना केली आहे. त्याच धर्तीवर चर्मकार समाजासाठी स्वतंत्र संत रविदास संशोधन वं प्रशिक्षण संस्था () एस आर आर टी आय शासनाने स्थापन करावी जेणे करून चर्मकर समजतील तत्सम जाती तसेच उपजातीला न्याय मिळेल त्याकरिता आपण खास बाब म्हणून लक्ष घालून महाराष्ट्रातील चर्मकार समाजाला न्याय देण्यात यावा तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व विकास महामंडळाचे थकीत कर्ज सरसकट माफ करण्यात यावे आणि रमाई घरकुलाचे बजट वाढविण्यात यावे हि नम्र विनंती. अन्यथा महाराष्ट्रातील चर्मकार समाजातर्फे लोकशाही मार्गाने राज्यभर तीव्र आंदोलन करण्यात येईल.असे बीड जिल्हाअध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. सदरील निवेदनावर जिल्हाउपाध्यक्ष राजू उनवणे ,युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव ,युवा जिल्हा सचिव ऑड दत्ता जाधव व तालुका अध्यक्ष सुभाष कांबळे यांच्या स्वाक्षरी आहेत

# वशिष्ट कागणे यांची पोलिस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती; मुंबई येथे आयुक्तालयात झाले रुजू

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहर पोलिस स्टेशन या ठिकाणी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक म्हणून उत्कृष्ट कामगिरी केलेले वशिष्ट सटवाजी कागणे यांची पोलिस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती झाली आहे. पोलिस निरीक्षक म्हणून ते नुकतेच नवी मुंबई पोलिस आयुक्तालयात रुजू झालेले आहेत त्या ठिकाणी त्यांना पोलिस स्टेशन दिले जाणार आहे. कागणे यांच्या पदोन्नती बद्दल अंबाजोगाई शहर व धारुर तालुक्यातून अभिनंदन केले जात आहे.



वशिष्ट सटवाजी कागणे हे धारुर तालुक्यातील धुनकवाड या गावचे रहिवासी साधारणत १९९१ साली म्हणजे ३३ वर्षापूर्वी ते पोलिस दलात पोलिस शिपाई म्हणून रुजू झाले त्यांनी पोलिस मुख्यालय बीड, पोलिस स्टेशन परळी ग्रामीण, शिरसाळा पोलीस स्टेशन, घाटनांदुर पोलिस चौकी, पोलिस स्टेशन शिरुर कासार, अंबाजोगाई ग्रामीण पोलिस स्टेशन, अंबाजोगाई पोलिस उपअधिक्षक कार्यालय, पोलिस स्टेशन अंबाजोगाई शहर या ठिकाणी पोलिस शिपाई ते सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक पदांवर त्यांनी सेवा केली. पोलिसी सेवेत असताना आणि पदाची जबाबदारी असताना त्यांनी त्या ठिकाणी आपली सेवा व कर्तव्य तत्परता दाखविली आहे. पोलिसात सुद्धा एक माणूस दडलेला असतो तो वेगवेगळ्या भुमिकेत असतो कधी पिता, कधी मुलगा, कधी पती तर कधी कर्मचारी असतो या चारही ठिकाणी त्यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले आहे. चारही क्षेत्रांना न्याय देण्याची त्यांची भुमिका राहिलेली आहे. धुनकवाड सारख्या ग्रामीण भागातून आलेले वशिष्ट कागणे यांनी कधीही आक्रास्ताळेपणा किंवा कोणाला तरी आडकविण्याची भुमिका घेतली नाही सत्याचा मार्ग स्वीकारत त्या मार्गानेच त्यांची ३३ वर्षे सेवा राहिलेली आहे. २०१३ साली ते पोलिस खात्यातर्गत त्यांनी उपनिरीक्षकपदाची परिक्षा दिली. मात्र तांत्रिक अडचणीमध्ये व न्यायालयीन प्रक्रियेमध्ये त्यांची निवड व नियुक्ती खोळंबली. परंतु कर्तव्य श्रेष्ठ मानून त्यांनी निर्व्यसनी राहत आपली सेवा सातत्य ठेवलेले आहे. त्यांच्या सेवेचा आलेख पाहता २०१३ साली दिलेल्या परिक्षेत उत्तीर्ण झाल्याने आणि सर्वसोपस्कार पार पडल्यानंतर त्यांची नुकतीच पोलिस उपनिरीक्षक म्हणून निवड करण्यात आली. पोलिस उपनिरीक्षक म्हणून त्यांची बदली ही नवी मुबई पोलिस आयुक्तालयात झालेली असून हे रुजू झालेले आहेत. पोलिस आयुक्तालयातून त्यांच्या सेवेचे ठिकाण केले जाते अंबाजोगाई येथून आपला एक सहकारी पोलिसउपनिरीक्षक झाल्याचा आनंद त्यांच्या सहकार्यांना आहे. त्यांच्या निवडीबद्दल धारुर व अंबाजोगाई तालुक्यातून वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# सरस्वती संस्कृत विद्यालयात संस्कृत दिन साजरा

**अंबड । प्रतिनिधी**

सरस्वती संस्कृत विदयालय अंबड येथे दिनांक २० ऑगस्ट रोजी संस्कृत दिन उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमास डॉ. योगेश ढेबरे, डॉ. राहुल बागुल, ह.भ.प. विष्णु महाराज गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती यामध्ये विदयार्थ्यांनी भगवितगितेमधील श्लोक, सुभाषीते, संस्कृत गिल, श्लोक, गणपती अर्थवशिर्ष ई. सादर केले.



श्री.ह.भ.प.विष्णु महाराज गुरव यांनी प्रतिकुल परिस्थीतीतुन विदयालयाची यशस्वी वाटचाली बाबत माहिती दिली तसेच डॉ. योगेश ढेबरे, डॉ. राहुल बागुल यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. राहुल बागुल यांनी याप्रसंगी सांगितले कि मी या विदयालयाचा विदयार्थी असुन या विदयालयाच्या स्वर्गवासी संस्कृत शिक्षीका श्रीमती सौ. कमल गुरव यांनीच मला प्रथम भाषण करायला शिकविले होते प्रत्येक विदयार्थानी संस्कृत भाषा शिकली पाहीजे यातुन आपल्या भारतीय संस्काराचे दर्शन घडते असे मार्गदर्शन केले. डॉ. योगेश ढेंबरे यांनी संस्कृत शिकत असलेल्या विदयार्थ्याचे कौतुक केले व विदयालयाचे कार्यपाहुन आनंद व्यक्त केला तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सहभागी विदयार्थ्याना मान्यवरांचे शुभहस्ते सहभाग प्रमाणपत्र व बक्षीस देवुन गौरविण्यात आले. आभार प्रदर्शन युधीष्ठीर ढोले या विदयार्थ्याने केले स्वर्गवासी संस्कृत शिक्षीका श्रीमती सौ. कमल गुरव यांच्या यांना श्रध्दांजली अर्पण करुन पसायदान म्हणुन कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रमास संस्कृत शिक्षीका श्रीमती सुनिता साबळे यांच्यासह विदयार्थी, विदयार्थीनी नागरीकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



# तालुकास्तरीय बुध्दिबळ स्पर्धेत विवेकानंद इंग्लिश स्कूल प्रथम

**मंठा । प्रतिनिधी**

केंधळी (ता. मंठा) येथील विवेकानंद इंग्लिश स्कुलच्या विद्याथ्यांनी तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेत यश संपादन केले आहे. १४ वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. या यशस्वी विद्यार्थ्यांमधून आयुष शिंदे, मेघराज गोसावी, देवेश काळे, चोधरी तर मुलींमधुन समृध्दी बोराडे, समृध्दी कदम, तन्वी निर्वळ, ज्ञानेश्वरी सानप यांनी प्रथम क्रमांक पटकावला.या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे शाळेचे अध्यक्ष शेषराव बाहेकर यांच्यासह संदीप बाहेकर, श्रीमती वर्षा बाहेकर, प्राचार्या रश्मी यादव यांनी क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर जाधव आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# तिगाव येथील उषा संदिपान जाधव यांचे दुख:द निधन

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील तिगांव येथील रहिवासी असणारे सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे वैभव जाधव व ऋुषिकेष जाधव यांच्या मातोश्री उषाबाई संदिपान जाधव यांचे निधन काल मंगळवार दि.२०/०८/२०२४ रोजी सांयकाळी सहा-सात वाजण्याच्या दरम्यान अल्पशा आजाराने झाले. निधना समयी त्यांचे वय ४६ वर्ष होते.



उषाबाई संदिपान जाधव यांचा स्वभाव अतिशय शांत व सयंमी आणी मनमिळाऊ होता. त्यांना परिसरात आई या नावाने ओळखले जात होते.आई या इतरांना मदत करित असत.त्यांच्यावर शिवाजी महाराज, मॉ जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्या विचाराचा मोठा पगडा होता.अंत्यत प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षित केले. मंगळवार दि.२०/०८/२०२४ रोजी त्यांना अस्वस्थ वाटु लगले म्हणून त्यांना बीड येथील काकु - नाना हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले परंतु उपचार चालू असताना त्यांनी उपचाराला कोणताही प्रतिसाद दिला नाही. उपचार चालू असतानाच सांयकाळी सहा- सात वाजण्याच्या दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.दि.२१/०८/२०२४ रोज बुधवार यादिवशी सकाळी ९:०० वाजण्याच्या सुमारास यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी तिगांव येथील सरपंच, गावातील प्रतिष्ठित नागरिक, गावातील व परिसरातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर शिक्षक, प्राध्यापक, वकिल, डॉक्टर, प्रत्रकार इ.मोठ्या संख्येने उपस्थित होते. जाधव परिवाराच्या या दु:खा मध्ये आम्ही सर्वजन सहभागी आहोत. त्यांना सावरण्याची ईश्वर शक्ती देवो अशी आम्ही प्रार्थना करतो.

# छत्रपती संभाजीनगरसाठी पीक विम्यापोटी मिळाले ३७० कोटी

संभाजीनगर : नैसर्गिक आपत्तीमुळ नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यातील ४ लाख ३८ हजार २०३ शेतकऱ्यांपैकी ३ लाख ६४ हजार ७९९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात तीन टप्प्यांत एकूण ३७० कोटी ८५ लाख रुपयांची पीक विमा रक्कम जमा झाली आहे.

जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेत विमा कंपन्यांवर तातडीने रक्कम वितरण करण्यासाठी दबाव आणला. त्यामुळे शेतकर्यांना मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे. जिल्ह्यातील सोयगाव आणि वैजापूर तालक्यातील शेतकऱ्यांना पीकविम्याचा सर्वाधिक लाभ मिळाला आहे. या दोन्ही तालुक्यांमध्ये ९८% पेक्षा अधिक शेतकऱ्यांना विमा लाभ मिळाला आहे. तर फुलंब्री तालुक्यातील शेतकऱ्यांना सर्वात कमी लाभ मिळाला आहे. छ. संभाजीनगर तालुक्यातील ३४,१६७ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी २६,५७८ शेतकऱ्यांना २४.५३ कोटी विमा मिळालेला आहे.

गंगापूर तालुक्यातील ६०,७८३ शेतकऱ्यांनी



विमा काढलेला होता त्यापैकी ५३,८७८ शेतकऱ्यांना ५७.८६ कोटी विमा मिळालेला आहे. कन्नड तालुक्यातील ६७,१९६ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी ५८,२०४ शेतकर्यांना ५१.७१ कोटी विमा मिळालेला आहे. खुलताबाद तालुक्यातील २०,४४१ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी १३,८७७ शेतकऱ्यांना १०.१० कोटी विमा मिळालेला आहे. पैठण तालुक्यातील ५४,६०६ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी ३५,७४३ शेतकऱ्यांना २६.४४ कोटी रू. विमा मिळालेला आहे. फुलंब्री तालुक्यातील ३६,३६७ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी १९,२६३ शेतकर्यांना १४.८८ कोटी रू. विमा मिळालेला आहे. सिल्लोड तालुक्यातील ६१,६७१ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी ५५,३०५ शेतकऱ्यांना ४८.७३ कोटी रू. विमा मिळालेला आहे. सोयगाव तालुक्यातील २०,८५७ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी २०,७८७ शेतकऱ्यांना ३१.१४ कोटी रू. विमा मिळालेला आहे. वैजापूर तालुक्यातील ८२,११५ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी ८१,१६४ शेतकऱ्यांना १०५.४५ कोटी रू. विमा मिळालेला आहे. एकूण ४,३८,२०३ शेतकऱ्यांपैकी ३,६४,७९९ शेतकऱ्यांना ३७०.८५ कोटी रू. विमा मिळाला आहे. शेतकरी संघटनांनी जिल्हा प्रशासनाच्या या प्रयत्नांचे स्वागत केले असून त्यांनी शेतकऱ्यांना विमा लाभ मिळण्यासाठी केलेल्या प्रयत्नांसाठी जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## पावसामुळे वेगवेगळ्या पिकाचे भारी प्रमाणात नुकसान



पुणे : राज्यात यावर्षी पावसामुळे वेगवेगळ्या पिकाचे भारी प्रमाणात नुकसान झाले आहे. जुलै महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पुणे जिल्ह्यातील सुमारे १ हजार ७४ हेक्टरवरील पिके व फळबागा बाधित झालेल्या आहेत. पुणे जिल्ह्यातील सात तालुक्यात ३३ टक्क्यांपेक्षा पिकांचे अधिक नुकसान झाले आहे. आतापर्यंत सुमारे ३ हजार ९४८ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी काचोळे यांनी पीक नुकसानीपोटी संबंधित शेतकर्यांना २ कोटी ४ लाख १ हजार २७९ रुपया इतकी मदत मिळणे अपेक्षित असल्याची माहिती दिली आहे.

कृषी विभागाने जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या शेती आणि फळपिकांच्या नुकसानीचा ताजा अहवाल तयार केलेला आहे. त्यामध्ये जिरायत पिकांचे व बागायत पिकांचे अतिवृष्टीमुळे सर्वाधिक नुकसान झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

अहवालानुसार फळपिके सोडून जिरायत पिकांखालील २ हजार ७६९ शेतकर्यांचे ६५५.४८ हेक्टर, फळपिके सोडून बागायत पिकांखालील १ हजार १२९ शेतकर्यांचे ४०३.७४ हेक्टर आणि फळपिकांखालील बाधित क्षेत्राच्या ५० शेतकर्यांचे १५.०८ हेक्टर मिळून एकूण ३ हजार ९४८ शेतकर्यांचे १ हजार ७४ हेक्टर वरील पिके बाधित झाल्याचेही काचोळे यांनी स्पष्ट केले. हवामान विभागाच्या अंदाजानुसार ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात सुद्धा राज्यात चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे. विशेषतः सप्टेंबर महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. राज्यात वेगवेगळ्या भागात पिकांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे शेतकर्यांनी सावधगिरी बाळगण्याची गरज आहे.

## पुणे जिल्ह्यातील १ हजार ७४ हेक्टरवरील पिके पावसाने प्रभावित

पुणे : राज्यात यावर्षी पावसामुळे वेगवेगळ्या पिकाचे भारी प्रमाणात नुकसान झाले आहे. जुलै महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पुणे जिल्ह्यातील सुमारे १ हजार ७४ हेक्टरवरील पिके व फळबागा बाधित झालेल्या आहेत. पुणे जिल्ह्यातील सात तालुक्यात ३३ टक्क्यांपेक्षा पिकांचे अधिक नुकसान झाले आहे. आतापर्यंत सुमारे ३ हजार ९४८ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी काचोळे यांनी पीक नुकसानीपोटी संबंधित शेतकर्यांना २ कोटी ४ लाख १ हजार २७९ रुपया इतकी मदत मिळणे अपेक्षित असल्याची माहिती दिली आहे. कृषी विभागाने जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या शेती आणि फळपिकांच्या नुकसानीचा ताजा अहवाल तयार केलेला आहे. त्यामध्ये जिरायत पिकांचे व बागायत पिकांचे अतिवृष्टीमुळे सर्वाधिक नुकसान झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. अहवालानुसार फळपिके सोडून जिरायत पिकांखालील २ हजार ७६९ शेतकर्यांचे ६५५.४८ हेक्टर, फळपिके सोडून बागायत पिकांखालील १ हजार १२९ शेतकऱ्यांचे ४०३.७४ हेक्टर आणि फळपिकांखालील बाधित क्षेत्राच्या ५० शेतकर्यांचे १५.०८ हेक्टर मिळून एकूण ३ हजार ९४८ शेतकऱ्यांचे १ हजार ७४ हेक्टर वरील पिके बाधित झाल्याचेही काचोळे यांनी स्पष्ट केले. हवामान विभागाच्या अंदाजानुसार ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात सुद्धा राज्यात चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे. विशेषतः सप्टेंबर महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. राज्यात वेगवेगळ्या भागात पिकांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी सावधगिरी बाळगण्याची गरज आहे.

## बफर स्टॉकमुळे कांद्याच्या भावात घसरण होण्याची शक्यता

पुणे : नाफेड खुल्या बाजारात बफर स्टॉक मधील कांदा वक्रीसाठी दाखल करणार अशा चर्चा सुरू झाल्या आहेत. मीडिया रिपोर्ट नुसार लवकरच नाफेडकडून खुल्या बाजारात बफर स्टॉक मधील कांदा विक्रीसाठी उतरवला जाण्याची शक्यता आहे. यामुळे सहाजिकच कांद्याची उपलब्धता वाढून बाजार भाव घसरण्याची भीती आहे.



अद्ययावत बाजार दरांनुसार, बुधवारी महाराष्ट्रात कांद्याला सरासरी दर २८८३.३३ प्रति क्विंटल एवढा मिळाला आहे. कांद्याला सर्वात कमी बाजारभाव २००० प्रति क्विंटल एवढा आहे. तर जास्तीत जास्त बाजारभाव ३८०० प्रति क्विंटल मिळालेला आहे. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत बुधवारी कांद्याला किमान २०००, कमाल ३८०० अन सरासरी २९०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला आहे. नाशिक लासलगाव बाजार समितीत कांद्याला किमान १,७००, कमाल ३,४२१ अन सरासरी ३,३११ रू प्रति क्विंटल असा भाव मिळाला आहे. सोलापूरच्या अकलूज बाजारात कांद्याला किमान १५००, कमाल ४००० अन सरासरी २८०० असा भाव मिळाला आहे. अहमदनगरच्या पारनेर बाजारात कांद्याला किमान १५००, कमाल ४२०० अन सरासरी ३५०० असा भाव मिळाला आहे. अकोला बाजार समितीत कांद्याला किमान २०००, कमाल ४००० अन सरासरी ३५०० असा भाव मिळाला आहे. नागपूर बाजार समितीत लाल कांद्याला किमान ३०००, कमाल ४००० अन सरासरी ३७५० असा भाव मिळाला आहे. कोपरगाव शिरसगाव तिळवणी कृषी उत्पन्न बाजार समितीत उन्हाळी कांद्याला किमान २ हजार, कमाल कमाल ३७४० अन सरासरी ३६०० असा भाव मिळाला आहे. कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत उन्हाळी कांद्याला किमान १ हजार, कमाल ३६९६ अन सरासरी ३४५० असा भाव मिळाला आहे.

## सुधारित पद्धतीने करा केळी लागवड

केळी हे उष्ण कटीबंधीय फळ असून त्यास साधारण उष्ण व दमट हवामान चांगले मानवते. साधारणतः १५ ते ४० डिग्री सेंटीग्रेड पर्यंतचे तापमान या पिकास चांगले मानवते. हिवाळयात १२ सेंटीग्रेडचे खाली व उन्हाळयात ४० सेंटीग्रेडपेक्षा जास्त उष्ण हवामान असल्यास पिकावर अनिष्ट परिणाम होतो. केळीची पाने तापमान ६० सेंटीग्रेडपेक्षा कमी असल्यास पिवळी पडतात आणि ४४ सेंटीग्रेडपेक्षा तापमान जास्त झाल्यास केळीची वाढ खुंटते. उन्हाळयातील उष्ण वारे व हिवाळयातील कडाक्याची थंडी या पिकाला हानीकारक असते.

जमीन : केळी पिकाला भारी कसदार सेंद्रीय पदार्थयुक्त अशी गाळाची, भरपूर सुपिक, भुसभुशित किंवा मध्यम काळी एक मिटरपर्यंत खोल असलेली व पाण्याचा चांगला निचरा होणारी जमिन मानवतेग. क्षारयुक्त जमिनी मात्र केळी लागवडीस उपयुक्त नाहीत.

जाती : केळीच्या ३० ते ४० जाती आहेत. त्यापैकी पिकवून खाण्यास उपयुक्त जाती उदा. बसराई हरीसाल लालवेलची, सफेदवेलची, मुठडी, वाल्हा लालकेळी आणि शिजवून किंवा तळून खाण्यास उपयुक्त जाती उदा राजेळी, वनकेळ तसेच शोभेसाठी रानकेळ या जाती आहेत. बसराई या जातीला खानदेशी, भुसावळ, वानकेळ, काबुली, मॉरीशस, गव्हर्नर, लोटणं इत्यादी नांवे आहेत. व्यापारी दृष्टया ही जात महाराष्ट्रात सर्वात महत्वाची आहे. महाराष्ट्रामध्ये केळीच्या एकूण क्षेत्रापैकी ७५ टक्के क्षेत्र या जाती लागवडीखाली आहे.




याशिवाय हरीसाल, लालवेलची, सफेदवेलची, सोनकेळ, राजेळी, बनकेळ, वाल्हा, लालकेळ या जातींचीही लागवड केली जात आहे.

अभिवृध्दी : या पिकाची लागवड त्याचे खोडापासून निघणारे मुनवे (सकर) लावून केली जाते. मुख्य झाडाच्या वाढीच्या काळात आसपास बरीच मुनवे उगवतात. यात दोन मुख्य प्रकार आहेत. १) तलवारीच्या पात्याप्रमाणे टोकदार पाने असलेली व दणकट बुंध्याची २) रुंद पानाची गोल किरकोळ बुंध्याची. यापैकी पहिल्या प्रकाराची मुनवे नारळाच्या आकाराची अर्धा ते एक किलो वजनाचे अभिवृध्दी करिता वापरतात.

पूर्व मशागत : जमीन लागवडी पूर्वी लोखंडी नांगराने खोलवर नांगरुन कुळव्याच्या पाळया देऊन भूसभुसीत कराव्या. नंतर त्यामध्ये हेक्टरी १०० गाडया चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत घालून मिसळावे.

लागवडीचा हंगाम : केळीच्या लागवडीचा मोसम हवामानानुसार बदलत असतो. कारण हवामनाचा परिणाम केळीच्या वाढीवर, फळे लागण्यास व तयार होण्यास लागणारा कालावधी या वरच होत असतो. जून जुलै मध्ये लागवड केलेंडर बागेस मृगबाग म्हणतात. सप्टेबर ते जानेवारी पर्यात होणाऱ्या लागवडीस कांदेबाग म्हणतात. जून जूलै पैकी लागवडीपेक्षा फेब्रूवारी मध्ये केलेंडर लागवडीपासून अधिक उत्पन्न मिळते. या लागवडी मुळे केळी १८ महिन्याऐवजी १५ महिन्यात काढणे योग्य होतात.

लागवड पध्दत : लागवड करताना ०.५ ०.५ ०.५ मीटर आकाराचे खडडे खोदून किंवा स-या पाडून लागवड करतात. दोन झाडातील अंतर बसराई जाती करिता १.२५ १.२५ किंवा १.५० १ञ५० मीटर असते.

खते व वरखते : या झाडाची मुळे उथळ असतात. त्यांची अन्नद्रव्यांची मागणी जास्त असते. त्यामुळे वाढीच्या सुरुवातीच्या काळात (पहिले वार महिने) नत्रयुक्त जोरखताचा हप्ता देणे महत्वाचे ठरते. प्रत्येक झाडास २०० ग्रॅम नत्र ३ समान हप्त्यात लावणीपासून दुस-या तिस-या व चौथ्या महिन्यात द्यावे. प्रत्येक झाडास प्रत्येक वेळी ५०० ते ७०० ग्रॅम एरंडीची पेंड खतासोबत द्यावी. शेणखता बरोबर ४०० ग्रॅम ओमोनियम सल्फेट प्रत्येक झाडास लावणी करतांना देणे उपयुक्त ठरते. किड व रोग : केळीच्या झाडावर पनामा रोग, शेंडे झुपका इत्यादी महत्वाचे हानीकारक रोग विशेष करुन पडतात. किड त्या मानाने कमी पडते.




### महत्वाच्या घटना

१६३९ : ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी ने मद्रास (आताचे चेन्नई) शहराची सुरवात केली.
१८४८ : अमेरिकेने न्यू मेक्सिको हा प्रांत ताब्यात घेतला.
१८९४ : महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांविरुद्धच्या भेदभावाविरुद्ध लढ्यासाठी नाताळ भारतीय काँग्रेसची स्थापना केली (संस्थापक चित्रीत).
१९०२ : कॅडिलॅक मोटर कंपनीची स्थापना
१९०२ : मोटार वाहना मध्ये फिरणारे थिओडोर रूझवेल्ट हे अमेरिकेचे पहिले राष्ट्रपती होते.
१९२१ : महात्मा गांधी यांनी विदेशी वस्त्राची होळी पेटवली.
१९४१ : दुसरे महायुद्ध जर्मन सैन्याने लेनिनग्राडला वेढा घातला.
१९४२ : दुसरे महायुद्ध ब्राझिलने जर्मनी व इटालीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४४ : दुसरे महायुद्ध सोविएत युनियनने रोमानिया जिंकले.
१९६२ : फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष चार्ल्स द गॉल यांची हत्या करण्याचा कट फसला.
१९७२ : वर्णद्वेषी धोरणाबद्दल ऱ्होडेशिया (झिम्बाब्वे) ची आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीतुन हकालपट्टी करण्यात आली.
२०१८ : भारतीय नेमबाज राही सरनोबत यांनी २५ मीटर पिस्तूल शूटिंगमध्ये सुवर्णपदक मिळवून आशियाई खेळांच्या नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. अशी कामगिरी करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४७ : प्रेशर कुकर चे निर्माते डेनिस पेपिन यांचा जन्म. (मृत्यू: २६ ऑगस्ट १७१३)
१७६० : पोप लिओ बारावा.
१८४८ : शिकागो डेली न्यूज चे स्थापक मेलविले एलिया स्टोन यांचा जन्म. (मृत्यू: १५ फेब्रुवारी १९२९)
१८७७ : पाश्चात्य भारतीय संस्कृतीचे प्रारंभिक भाषांतरकार,इतिहासकार आणि भारतीय कलेचे तत्त्वज्ञ आनंद केंटिश कुमारस्वामी यांचा जन्मदिन.
१८९३ : अमेरिकन लेखक डोरोथी पार्कर यांचा जन्म.
१९०४ : डेंग जियाओ पिंग सुधारणावादी चिनी नेते (मृत्यू: १९ फेब्रुवारी १९९७)
१९१५ : शंभू मित्रा बंगाली रंगभूमीवरील अभिनेते, दिग्दर्शक व नाटककार (मृत्यू: १९ मे १९९७)
१९१५ : इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाचे रचनाकार जेम्स हिलियर यांचा जन्म. (मृत्यू: १५ जानेवारी २००७)
१९१८ : डॉ. बानू कोयाजी कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात सलग साठ वर्षे कार्य करणार्या सामाजिक कार्यकर्त्या. त्यांना पद्मभूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार, रामेश्वरदास बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार, पुण्यभूषण पुरस्कार, पुणे विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लेटर्स (१९५५) इ. पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पुण्यातील के. इ. एम. रुग्णालय, जहांगीर नर्सिंग होम, दैनिक सकाळ, इंडिया फाउंडेशन इ.संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. (मृत्यू: १५ जुलै २००४)
१९१९ : गिरीजाकुमार माथूर साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक लेखक व कवी (मृत्यू: १० जानेवारी १९९४)
१९२० : डॉ. डेंटन कूली हृदयरोपण शस्त्रक्रियेचा पाया घालणारे अमेरिकन शल्यविशारद
१९२४ : भारतीय आधुनिक हिंदी साहित्याचे प्रख्यात व्यंगचित्रकार आणि विनोदी लेखक हरिशंकर परसाई यांचा जन्मदिन.
१९३५ : पंडित गोपीकृष्ण कथ्थक नृत्यशैलीचे बनारस घराण्याचे नर्तक, नृत्यदिग्दर्शक व अभिनेते. भरतनाट्यम, कथकली, मणिपुरी आदी नृत्यप्रकारांतही त्यांनी नैपुण्य मिळवले होते. १९५७ मध्ये त्यांनी ८२ दिवसांत ८७ कार्यक्रम करुन विक्रम केला. (मृत्यू: १८ फेब्रुवारी १९९४)
१९५५ : चिरंजीवी भारतीय चित्रपट अभिनेते, राजकारणी व माजी भारतीय पर्यटन मंत्री
१९६४ : मॅट्स विलँडर स्वीडीश टेनिस खेळाडू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५० : फिलिप (सहावा) फ्रान्सचा राजा (जन्म: ?? १२९३)
१६०७ : लंडन कंपनीची स्थापक बर्थलॉम्व गोस्नेल यांचे निधन.
१८१८ : वॉरन हेस्टिंग्ज भारताचा पहिला गव्हर्नर जनरल (जन्म: ६ डिसेंबर १७३२)
१९६७ : जन्म नियंत्रण गोळीचे निर्मिते ग्रेगरी गुडविन पिंटस यांचे निधन. (जन्म: ९ एप्रिल १९०३)
१९७८ : जोमो केन्याटा केनियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: २० आक्टोबर १८९३)
१९८० : चित्रपट अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक किशोर साहू यांचे बँकॉक विमानतळावर विमानात चढत असताना हृदयविकाराच्या झटक्याने निधन (जन्म: २२ नोव्हेंबर १९१५)
१९८० : मॅकडोनेल विमानाचे निर्माते जेम्स स्मिथ मॅकडोनेल यांचे निधन. (जन्म: ९ एप्रिल १८९९)
१९८२ : एकनाथजी रामकृष्ण रानडे क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक व कन्याकुमारी येथील विवेकानंद शिला स्मारकाचे शिल्पकार. अधिकाधिक लोकांचा सहभाग असावा म्हणून मोठमोठ्या देणग्या जमा न करता एक एक रुपया जमा करुन त्यांनी विवेकानंद स्मारकाचे प्रचंड काम उभे केले आहे. (जन्म: १९ नोव्हेंबर १९१४)
१९८९ : पं. कृष्णराव शंकर पंडित ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक. राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी त्यांचा 'राष्ट्रीय गायक' म्हणून गौरव केला होता. (जन्म: २६ जुलै १८९३)
१९९५ : पंडित रामप्रसाद शर्मा संगीतकार, ट्रम्पेट व व्हायोलिनवादक. 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' याजोडीतील प्यारेलाल यांचे ते वडील होत. (जन्म:)
१९९९ : सूर्यकांत मांडरे मराठी चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते, पद्मश्री (१९७३). त्यांच्या 'धाकटी पाती' या आत्मचरित्राला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला आहे.
२००१ : शरद तळवलकर आपल्या सदासतेज अभिनयाने मराठी रसिकांच्या मनावर प्रदीर्घकाळ प्रसन्नतेचे अधिराज्य गाजवणारे विनोदी कलाकार (जन्म: १ नोव्हेंबर १९२१)
२०१४ : भारतीय लेखक, कवी आणि नाटककार यू. ए. अनंतमूर्ती यांचे निधन. (जन्म: २१ डिसेंबर १९३२)
२०१८ : गुरुदास कामत , भारतीय राजकीय नेते (जन्मतारीख: ५ ऑक्टोबर, १९५४)

# पिक विमा, अनुदान, कर्जमाफीसाठी शेकापचे निवेदन

## विमा कंपनीसह शासनाची मनमानी खपवून घेणार नाही –भाई ॲड.नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षापासून शेतकरी आणि शेती प्रचंड संकटात असून देखील शेतकऱ्यांचा सन २०२० सालचा पिक विमा शासनाने अद्याप दिला नाही तसेच २०२३ सालचा पिक विम्यात शासनाचे मंत्री व विमा कंपनी यांनी आपसात संगणमत करून शेतकऱ्याच्या हातावर तुरी देण्याचे काम केले आहे.



वास्तविक विमा कंपनीचे गौबंगाल उघडे पडले असून एकाच गावातील एकाच पिकाच्या शेतकऱ्यांनी एकाच दिवशी झालेल्या नुकसानीच्य केलेल्या अर्जावर वेगवेगळे शेरे मारून विमाकंपनीने एका शेतकऱ्याला नुकसान भरपाई दिली आहे तर दुसऱ्या शेतकऱ्याला नाकारली आहे हा सावळा गोंधळ म्हणजे दुसरे तिसरे काही नसून विमा कंपनी आणि सरकारमधील मंत्र्यांनी संगणमत करून शेतकरी उध्वस्त करण्याचा रचलेला कट असून शेतकऱ्यांच्या शेतमालाला किफायतशीर हमीभाव देण्याचे जाणीवपूर्वक टाळून केवळ शेतकऱ्याला आमीषे दाखवण्याचा प्रयत्न करत तुटपुंजे अनुदान दिले जात असून त्यामध्ये हजारो शेतकऱ्यांनी गतवर्षी ई-पीक पाहणी करून देखील त्यांची नावे २०२३ च्या अनुदान यादीत आलेली नाहीत यामुळे गरजवंत शेतकरी लाभापासून कोसो दूर असल्याने सरसकट अनुदान वाटप होणे आवश्यक असताना शासन वेळकाढूपणा करून केवळ जाहिरात बाजी करत आहे, तर हजारो शेतकऱ्यांची शेती परवडत नाही म्हणून आत्महत्या होत असताना तसेच गेल्या पंधरा वर्षापासून कर्जमाफीचा मुद्दा प्रलंबित असताना अंबानी, आदानीच्या घशात कोट्यावधीची कर्जमाफी घालणारे सरकार जाणीवपूर्वक शेतकऱ्यांना कर्जमाफी देत नाही, अनेक दशकापासून शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या किफायतशिर हमीभावाचा प्रश्न ऐरणीवर असताना लबाड राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यायला तयार नाहीत, याशिवाय माजलगाव मतदार संघातील लोकनेते साखर कारखान्यांने गेल्या दोन वर्षापासूनची थकीत बिले अद्याप दिलेली नाहीत, शेतकरी प्रचंड संकटात असताना राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या दुख:वर मीठ चोळण्याचे पाप करत आहेत, हि बाब शेतकरी कामगार पक्ष कदापिही खपवून घेणार नाही तर सरसकट पीक विमा द्या, सरसकट अनुदान द्या, सरसकट कर्जमाफी द्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव द्या.लोकनेते कारखान्याकडे २०२२-२०२३ व २०२३-२०२४ चे उसाचे थकीत बिले त्वरित द्या. या मागण्यासाठी २० ऑगस्ट रोजी तहसीलदार माजलगाव यांना वरील मागण्याची निवेदन दिलेले आहे, निवेदनात दिनांक २८ ऑगस्ट रोजी छोटीवाडी फाटा येथे सकाळी १०:०० वाजता रस्ता रोको, दिनांक २९ ऑगस्ट रोजी माजलगाव परभणी चौकात सकाळी १०:०० वाजता रस्ता रोको व दिनांक ३० ऑगस्ट रोजी पात्रुड येथे लोणगाव चौकात सकाळी १०:०० वाजता रस्ता रोको करण्यात येणार असून या आंदोलनात शेतकरी बांधवांनी आपले हक्क व अधिकार मिळवण्यासाठी हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती समिती सदस्य भाई ॲड.नारायण गोले पाटील, बालासाहेब येवले, दत्तात्रय सोळंके, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण,नितीन येवले, कॉ.फारुख सय्यद, तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ, तालुका सह चिटणीस भाई राहुल सोळंके, सतीश शेजुळ, खजिनदार भाई विष्णू शेळके, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका चिटणीस भाई आनंत चव्हाण, शेतकरी सभेचे तालुका अध्यक्ष भाई सुदाम चव्हाण, शेतकरी सभेचे तालुका चिटनिस भाई माऊली चंदनशिव, भाई राजेभाऊ शेरकर, भाई किशोर पांचाळ, भाई चांगदेव शेजुळ, भाई साळुंजी हांडे, अध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका चिटणीस भाई आनंत चव्हाण, शेतकरी सभेचे तालुका अध्यक्ष भाई सुदाम चव्हाण, शेतकरी सभेचे तालुका चिटनिस भाई माऊली चंदनशिव, भाई राजेभाऊ शेरकर, भाई किशोर पांचाळ, भाई चांगदेव शेजुळ, भाई साळुंजी हांडे, भाई श्रीराम शेवाळे, भाई मनोहर माने, भाई गणेश सोनटक्के, भाई भास्कर कांबळे आदींनी केले आहे.

## महाराष्ट्राचे कुलदैवत श्री.खंडोबा अठरापगड समाजाचे आराध्य दैवत–भारती महाराज

पिंपळवंडी । प्रतिनिधी

खंडोबा हे महाराष्ट्रातील अठरा पगड जाती धर्माचे कुलदैवत असून खंडोबा देवाला विशेषता महाराष्ट्रात कुलदैवत म्हणून मानतात.खंडोबाला 'मल्हारी मार्तंड' ही म्हणतात.उन्मत मल्ल या दैत्याचा वध केल्याने मल्लाला हरवणारा म्हणून ' मल्हारी ' व खंडोबा एकच असून महाराष्ट्रातील अनेक नागरिक अनेक राज्यात कामानिमित्त स्थायिक झालेले आहेत.त्यांनी त्या ठिकाणी खंडोबांची मंदिर बांधून कुलदैवताची आराधना करतात.तसेच पांडुरंगाच्या मंदिरात सुद्धा खंडोबाचे मंदिर आहे.महाराष्ट्रात ग्रामदेवता,उपात्सात देवता,कुलदैवता या तीन देवताला विशेष महत्त्व आहे.असे विवेचन श्री.ह.भ.प.गुरुवर्य महादेवानंदजी भारती महाराज यांनी सुश्राव्य अमृततुल्य किर्तनातून केले.



पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी अंतर्गत नाकाडेवाडी येथे दि.१९/०८/२०२४ सोमवार रोजी गुरुवर्य श्री.स्वामी महंत महादेवानंद भारती महाराज मठाधिपती श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी यांचे शुभहस्ते श्री.खंडोबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा व हनुमान मूर्ती स्थापना कार्यक्रम मोठ्या भक्तीमय व उत्साही वातावरणात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे पौरोहीत्य वे.शा.स.सचिन चंद्रशेखर कुलकर्णी (देवा)यांनी केले. या ठिकाणी खंडोबाचे भव्य-दिव्य मंदिर बांधले आहे.यावेळी महंत महादेवानंद भारती महाराज यांनी किर्तनातून असे सांगितले की,''बा'' शब्दाला मोठे महत्त्व आहे.''बा'' म्हणजे बाप अनेक देव-देवतांच्या पुढे ''बा'' हा शब्द आहे. खंडोबा, विठोबा, तुकोबा, ज्ञानोबा वारकऱ्यांसाठी ''बाप'' हे विश्लेषण पूर्वीपासून लागू आहे. खंडोबाप्रमाणे जय हनुमान व अन्य देवतांच्या अख्यायिका सांगून देवदेवतांची व साधू-संत महंतांचा सर्वांनी आदर्श घ्यावा असा उपदेश केला.तसेच मी या परिसरातील शेतकरी,ऊसतोड मजूर ऊस उत्पादक व्हावा यासाठी साठवण तलावासाठी प्रयत्न करून साठवण तलाव झाल्याने शेतकऱ्यांमध्ये हरित-क्रांती झाली आहे.साठवण तलाव झाल्याने या परिसरात शेतकरी ४० हजार मेट्रिक टनाचे दरवर्षी उत्पादन घेत आहेत.याचे मला समाधान वाटत आहे.शेतकऱ्यांनी शेतीत नवनवीन उत्पादन घेऊन नवीन प्रयोग राबवून प्रगती करावी व मुलांना उच्च शिक्षण देऊन त्यांना मोठे बनवावे असे मार्गदर्शन केले.यावेळी समाजसेवक विजय गोल्हार,युवा नेते भाऊसाहेब भवर,सरपंच निलेश मोरे, चेअरमन शिवाजी पवार,सरपंच रविंद्र केकान,शिवसेना पाटोदा तालुकाप्रमुख अशोक पवार,ग्रामपंचायत सदस्य बंडू पवार,बद्री पवार,पत्रकार बबनराव उकांडे तसेच परमेश्वर सातपुते व भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी बहुसंख्येने आलेल्या भाविक-भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.या सोहळ्याला माऊली आप्पा जरांगे,राम खाडे यांनी भेट देऊन प्रसादाचा लाभ घेतला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समस्त ग्रामस्थ नाकाडेवाडी व मित्र मंडळाने परिश्रम घेतले.

## बेरोजगारी संपवण्यासाठी क्रांती सेना संघर्ष करणार- मुंडे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदार संघ हा माजलगाव धरनामुळे सुजलाम - सुफलाम बनलेला आहे हा सधन तालुका आहे मात्र या भागात बेरोजगारी पण मोठ्या प्रमाणावर दिसते त्या साठी या भागात मोठमोठे उद्योग उभारून या वर मात केली जाऊ शकते त्या साठी राष्टीय क्रांती सेनेने पाऊल उचलले असून लवकरच मोठे आंदोलन उभारणार आल्याचे राष्टीय क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे यांनी दि २० ऑगस्ट मंगळवार रोजी माजलगाव येथील पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.




माजलगाव विधान सभा मतदार संघाने अनेकांना मोठे केलं येथील राजकारण्यांनी आपलीच प्रगती गेली गोरगरीबाकडे दुर्लक्ष केलं.या मुळे या भागातील सुशिक्षित तरुण बेरोजगार राहिला शेहरात जाऊन वीस हजार प्रति महिना नौकरी करून त्याचा प्रपंच चालू शकत नाही म्हणून त्याला आपल्याच भागात काम मिळाले तर तो चांगला राहू शकतो.यासाठी या भागात मुबलक पाणी असल्याने मोठी औद्योगिक वसाहत करून येथे मोठे उद्योग उभारणे शक्य आहे.या मुळे या भागातील सुशिक्षित तरुणांच्या हाताला काम मिळेल यासाठी राष्टीय क्रांती सेना संघर्ष करणार असल्याचे सांगितले.त्याच बरोबर या भागात सर्व आजारांवर मोफत ईलाज होण्यासाठी सर्व सोईनी युक्त दवाखाना , गरिबांच्या मुलांना मोफत चांगले शिक्षण मिळण्यासाठी दवाखाना शाळा , उभारण्याचे तसेच योग्य प्रकारचे दळण -वळण होण्यासाठी सगळीकडे खेड्यापासून शहरापर्यंत चांगल्या दर्जाचे रस्ते करण्यासाठी प्रयत्न करणार आल्याचे सांगितले.या पत्रकार परिषदेला भास्कर नाना शिंदे , चौधरी हे उपस्थित होते. होऊ घातलेल्या विधान सभा निवडणूक विषयी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की राष्ट्रीय क्रांती सेनेच्या विचारांशी एक मत असलेल्या उमेदवारांना सहकार्य करणार असल्याचे सगतांनाच कोणत्याही पक्षाच्या उमेदवाराला पाठींबा दिला जाणार नाही हे आवर्जून सांगितले . मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मनोज जरांगे पाटलाच्या मागणीवर मत पत्रकारांनी विचारले असताते म्हणाले कीमनोज जरांगे पाटलांच्या मताशी मी पूर्ण सहमत नाही पण मराठ्यांना क्रिमिलेअर ची अट घालून शिक्षणात आरक्षण मिळाले पाहिजे असे मत व्यक्त केले. बेरोजगारी,मोठा दवाखाना,शाळा रस्ते,एम आय डी सी ,या विषयावर लवकरच राष्टीय क्रांती सेना आंदोलन करणार असल्याचे सूतोवाच केले.

## आदर्श क्रिकेट संघ सलग तिन सामने जिंकून उपांत्य फेरीत

बीड । प्रतिनिधी

१४ वर्षाखालील गटाच्या शासनमान्य नोंदणीकृत फ्रेंडस्? स्पोर्ट ॲकडमी आयोजीत क्रिकेट स्पर्धेत आज आदर्श क्रिकेट संघ बीड विरूध्द रोहन क्रिकेट संघ लातुर यांच्यात डीएसके मैदान सिदोड येथे सामना खेळण्यात आला यावेळी संजय धस यांच्या हास्ते नाणेफेक करण्यात आले रोहन संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला यावेळी फलंदाजीसाठी आलेल्या आदर्श संघाची सुरवात चांगली झाली नाही.





आदर्श संघाचा तडाखेबाज फंलदाज शौर्य जाधव हा केवळ ४ धांवावर आसतांना झेलबाद झाला तसेच राजन कवटेकर हा १९ धावा करून १०व्या षटकांत बाद झाला त्यांनतर आलेल्या पृथ्वी पाळणे व श्रवण गालफाडे यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला परंतु पृथ्वी स्वताच्या १५ धावावर आसतांना बाद झाला मात्र श्रवण यांने संघाची एकबाजू लावून धरत नाबाद ९४ धावा करत संघाची धावसंख्या ३५ षटकांत ८ बाद १६८ पर्यंत पोहचवली या धावाचा पाठलाग करतांना रोहन क्रिकेट लातूर संघ १०० धावांवर सर्व संघ बाद झाला आदर्श क्रिकेट संघाकडून गोलंदाजी करतांना कृष्णा गायकवाड यांने ७ षटकांत २ धावा देत ४ गडी बाद केले, तर रूद्राक्ष जाधव यांने ७ षटकांत केवळ २ धावा देत ३ गडीबाद केले, आदर्श क्रिकेट संघाने रोहन संधावर विजय मिळवत ३ सामन्यापैकी तिन्ही सामने जिंकून उपात्यं फेरीत मजल मारली हा सामना पाहण्यासाठी बीड मधील क्रिकेटप्रेमी सिदोड येथील डीएसके मैदानांवर उपस्थित होते सामनावीर चे पारितोषिक बीड जिल्हाक्रिकेट असोशियनचे सदस्य जावेद पाशा, रिजवान भाई, नासेर मोमीन यांच्या हस्ते कृष्णा गायकवाड व रूद्राक्ष जाधव ला देण्यात आला यावेळी स्पर्धा आयोजक फ्रेंडस्? स्पोर्ट ॲकाडमीचे अध्यक्ष तथा मनविसे राज्यउपाध्यक्ष ॲड्. शैलेश जाधव,बाबासाहेब गोरे, संतोष कवटेकर, आरूण गलांडे, संजय कुलकर्णी, आदर्श क्रिकेट संघाचे प्रशिक्षक अजहर शेख यांच्या सह क्रिकेट प्रेमी हजर होते.

## खऱ्या लाभार्थ्यांना लाभ मिळावा म्हणून प्रत्येक नागरिकांची जबाबदारी–सहाय्यक आयुक्त मेश्राम

आष्टी । प्रतिनिधी

शासनाच्या समाजातील प्रत्येक घटकांना योजना असून,फक्त सदरील योजनेची ख-या लाभार्थ्यांना मिळाव्यात म्हणून शासनाने तालुकास्तरीय मेळावे घेत आहेत.तरी समाजातील सर्व घटकांना योजनेचा लाभ ख-या लाभार्थ्यांना मिळाव्यात म्हणून प्रत्येक नागरीकांनी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन सहाय्यक संचालक श्रीमती एस.एन.मेश्राम यांनी केले.



इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचा दृष्टीकोनातून इतर मागास बहुजन विभागाच्यावतीने आष्टी येथील भगवान महाविद्यालयात तालुकास्तरीय मेळाव्याचे आयोजन बुधवार दि.२१ रोजी दुपारी १२ वा.करण्यात आले होते.यावेळी मेश्राम बोलत होत्या.याप्रसंगी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे वरिष्ठ निरीक्षक एल.जी.बारगजे, प्रा.एस.जी.विधाते,प्रा.डॉ.श्रीराम आरसुळ,प्रा.ज्ञानेश्वर नवले,सुखदेव पोकळे,मुख्याध्यापक एस.एम.चितळे,प्रा.एस.डी.दाणवे यांच्या आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. पुढे बोलतांना मेश्राम म्हणाल्या,''इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या आश्रमशाळा,भारत सरकार शिष्यवृत्ती योजना, वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आदी योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना कसा मिळेल, यासाठी शिक्षण संस्थांनी प्रयत्नशील राहावे. तसेच, विद्यार्थ्यांनीही या योजनांचा लाभ घ्यावा,'' असे आवाहनही मेश्राम यांनी केले. आष्टी-येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय मेळाव्यात सहाय्यक आयुक्त मेश्राम यांचे स्वागत करताना मान्यवर दिसत आहेत.

## बेदरवाडी येथील सप्ताहचा बुधवारी प्रारंभ

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालूक्यातील कुसळंब जवळील बेदरवाडी येथे प्रतिवर्षाप्रमाणे महंत गुरुवर्य स्वामी महादेवानंद भारती महाराज मठाधिपती श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी यांचे मार्गदर्शनाखाली बुधवार दि. २१/०८/२०२४ रोजी विणापुजनाने भाविक-भक्तांच्या उपस्थितीत भक्तीमय वातावरणात मोठया उत्साहात प्रारंभ झाला असून या सप्ताह सोहळ्याचा पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बेदरवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

या ठिकाणी दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत पुढील प्रमाणे किर्तनाचे कार्यक्रम संपन्न होत आहेत. बुधवार दि.२१/०८/२०२४ रोजी ह.भ.प.मामा महाराज काजळे (तनु टाकळी टेंभूर्णी),गुरुवार दि.२२/०८/२०२४ रोजी ह.भ.प.स्वर भास्कर अनंत महाराज काळे (संगमनेर),शुक्रवार दि.२३/०८/२०२४ रोजी ह.भ.प.राजेंद महाराज भवर (मुगगाव),शनिवार दि.२४/०८/२०२४ रोजी ह.भ.प.परमेश्वर महाराज खोसे (गिरवली),रविवार दि.२५/०८/२०२४ रोजी ह.भ.प. बिभिषन महाराज कोकाटे (दासखेड),दि. २६/०८/२०२४ रोजी ह.भ.प.रामदास महाराज खोटे (मुगगाव),मंगळवार दि. २७/०८/२०२४ रोजी ह.भ.प. परमानंद भारती महाराज(श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी), तसेच बुधवार दि.२८/०८/२०२४ रोजी सकाळी १० ते १२ दरम्यान महंत गुरूवर्य परमपुज्य श्री.श्री.१००८ महादेवानंद भारती महाराज यांचे काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर महाप्रसाद भाविक-भक्तासाठी होईल. व्यासपीठ चालक ह.भ.प. सखाराम महाराज ढास यांच्याकडे नियोजन आहे.

# अंबाजोगाईत निर्भय मार्निंग वॉक

## डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या कार्याला अभिवादन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील सर्व पुरोगामी विचारांच्या संघटना व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या कार्यकर्त्यांकडून दृष्टीकोन दिनी लोकशाही मार्गाने निर्भय मॉर्निंग वॉक फेरीच्या माध्यमातून विवेकीपणाने व संवैधानिक मार्गाने आपला आक्रोश व्यक्त करण्यात आला.




निर्भय मॉर्निंग वॉक च्या माध्यमातून खूनाच्या मुख्य सुत्रधारांना पकडण्याचे प्रशासनाला आवाहन करण्यात आले.अंबाजोगाई व परिसरातील सर्व पुरोगामी विचारांच्या संघटना व चळवळीचे कार्यकर्ते, नागरिक, विद्यार्थी, महिला, सर्वांनी शांततापूर्ण पद्धतीने यात सहभाग नोंदवला स्वा.रा.ती.महाविद्यालय येथील संविधान कट्टा येथून सकाळीच मॉर्निंग वॉकची सुरुवात झाली. नंतर नियोजित मार्गाने येत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे या फेरीचा सकाळी समारोप करण्यात आला. समारोपावेळी उपस्थित सर्वांसमोर प्रशासनास देण्यात येणाऱ्या विविध निवेदनांची माहिती सांगण्यात आली. तसेच डॉ. दाभोलकरांनी आयुष्यभर केलेल्या विज्ञानप्रसाराच्या कार्याचे स्मरण करून दिवसभर उपक्रम घेण्यात आले


### जाहीर प्रगटन

**भा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ११८१/२०२४**

**गवळणबाई विरुष्द निरंक, ॲड. मुंडे ए. जी.**

अर्जदार :- १) गवळणबाई भ्र. माणिक फड, वय ८५ वर्षे, धंदा काही नाही, रा. मु. पो. घाटसावळी, ता. जि. बीड. २) आशा भ्र.नवनाथ दराडे, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम, रा. जय भवानीनगर, शिफळाटा रोड, कल्याण पुर्व, काटेमा निवळी, ठाणे ३) राधाकिसन पि. माणिक फड, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. मु.पो. घाटसावळी, ता.जि. बीड ४) दिनकर पि. माणिक फड, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. सदर ५) दैवशाला भ्र.भगवान नागरगोजे, वय ४० वर्षे, धंदाः शेती, रा. वडगाव गुंधा, ता.जि.बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे माणिक पांडुरंग फड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत नामे माणिक पांडुरंग फड रा. मौजे घाटसावळी ता. जि. बीड यांचा मृत्यु दिनांक : ०१.०३.२०२४ रोजी राहते घरी मौजे घाटसावळी ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार क्र. १ हे मयताचे पती अर्जदार कमांक ०२ व ०५ हे मयताच्या मुली असुन अर्जदार कमांक ०३ व ०४ ही मयताची विवाहीत मुली आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही. वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत माणिक पांडुरंग फड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०८/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक २५/०९/२०२४.

स्वाक्षरित : **क. लिपिक**

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय,
व.स्तर, बीड.

याची एक प्रत डकवणे : १. मा. दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड यांचे नोटीस बोर्डावर डकविणे कामी. २. तहसिल कार्यालय, बीड यांचे नोटीस बोर्डावर डकविणे कामी. ३. ग्रामपंचायत कार्यालय मौजे घाटसावळी यांचे नोटीस बोर्डावर डकविणे कामी. ४. मयताचे राहते घरी रा. मौजे घाटसावळी ता.जि. बीड येथे डकविणे कामी.



### मा.श्री.ए.एस.जगताप, दिवाणी न्यायाधीश साहेब (कः तर) शिरुर (का) यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. १९२/२०२४**

**ॲड.व्ही.एस. मिसाळ**

अर्जदार : १) विजयकुमार पि. रामभाऊ उर्फ रामराव जायभाये वय-५२ वर्षे, धंदा-शेती, रा. दगडवाडी तहत रायमोहा ता. शिरुर (का) जि.बीड २) गोविंद पि. रामभाऊ उर्फ रामराव जायभाये वय-४२ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर

**विरुध्द निरंक**

दावा :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-१८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत १) रामभाऊ उर्फ रामराव पि. बाबुराव जायभाये व २) अहिल्याबाई भ्र. रामभाऊ उर्फ रामराव जायभाये यांचा मृत्यू झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत रामभाऊ उर्फ रामराव पि. बाबुराव जायभाये यांचा मृत्यू दिनांक ०१-०५- २००८ रोजी अहिल्याबाई भ्र. रामभाऊ उर्फ रामराव जायभाये यांचा मृत्यू दिनांक २७-०७-२०२० झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत १) रामभाऊ उर्फ रामराव पि. बाबुराव जायभाये व २) अहिल्याबाई भ्र. रामभाऊ उर्फ रामराव जायभाये यांच्या मृत्यूनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येत की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत १) रामभाऊ उर्फ रामराव पि.बाबुराव जायभाये व २) अहिल्याबाई भ्र. रामभाऊ उर्फ रामराव जायभाये यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २०-०८-२०२४ रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.०१-१०-२०२४ आहे.

प्रतिलिपी
दिवाणी न्यायालय, (क. स्तर) शिरुर (का)
तहसील कार्यालय, शिरूर (का)
ग्रामसेवक , ग्रामपंचायत कार्यालय, रायमोहा

शिक्का

**आदेशावरुन
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, (क. स्तर)
शिरुर (का)**

# अत्याचाराच्या त्या घटनांच्या निषेधार्थ आंदोलन

**जालना । प्रतिनीधी**

कलकत्ता येथील डॉकटर महीला आणि महाराष्ट्र राज्यातील बदलापूर येथील दोन शाळकरी चिमुकल्या मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनांच्या निषेधार्थ आज बुधवारी सायंकाळी काँग्रेस पक्षाच्या वतीने माजी नगराध्यक्षा सौ. संगीताताई गोरंटयाल आणि युवा नेते अक्षय गोरंटयाल यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ जोरदार आंदोलन करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण वाचवा, मुख्यमंत्री माझी लाडकी लेक वाचवा, नराधम आरोपींना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशा विविध घोषणा देत सहभागी आंदोलकांनी जालनेकरांचे लक्ष वेधले. यावेळी विजय चौधरी, महावीर ढक्का, बदर चाऊस, सौ.सुष्माताई पायगव्हाणे, दिनकर घेवंदे, अब्दुल रउफ परसुवाले, वाजेद पठाण,



शहर महीला काँग्रेसच्या अध्यक्षा सौ.शितलताई तनपुरे, सेवादल काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा अंजली सपकाळ, रमेश गौरक्षक, जगदीश भरतीया, अशोक भगत, संजय भगत, विनोद यादव, राज स्वामी, नजीब लोहार, राधाकिसन दाभाडे, चंद्रशेखर कोताकोंडा, आनंद वाघमारे, शेख शकील, फकिरा वाघ, ईर्शाद शेख, किशोर कदम, शेख शमशोद्दीन, इस्माईल परसूवाले, बालाजी रोडे, रॉबिन कमाने, संजय दाभाडे, संजय पाखरे, धरम सोनवणे, करीम लिडर, शेख अल्ताफ, शेख युसूब, विलास जगधणे, आरेफ सय्यद, योगेश, ढोबळे, सागर पोटपत्रेवार, मंदा पवार, सुषमा खरात, आशाताई जाधव, मोनिका जाधव, दुर्गा कांबळे, वंदना लालझरे, संतोष काबलीये, सीताबाई दाभाडे, प्रिया जाधव, सुजाता पोलास, सोनू सामलेटी, स्वाती गव्हाणे, लवेकर वृषाली, योगेश पाटील,संतोष तूपसौंदर, सागर ढक्का, गोपाल चित्राल, अंकुश येंगदळ, ओंकार घोडे, धावडे, राठोड, पापणवार, धानुरे, चित्राल यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित आंदोलकांनी राज्य सरकार विरुद्ध जोरदार घोषणा देत कलकत्ता आणि बदलापूर येथील घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. यावेळी युवा नेते अक्षय गोरंटयाल आणि दिनकर घेवंदे यांनी अत्याचारांच्या घटनांचा तीव्र शब्दात निषेध करत आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी आपल्या भाषणातून केली.

### आरोपींना कठोर शिक्षा करा –सौ. गोरंट्याल

कलकत्ता येथील एका महिला डॉक्टरसह महाराष्ट्रातील बदलापूर येथील एका शाळेतील चिमुकल्या बालिकांवर झालेल्या अत्याचाराच्या घटना अत्यंत निंदनीय आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या काळात महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून त्या रोखण्यासाठी शासनाने कडक पाऊल उचलावे आणि या दोन्ही घटनेतील आरोपींना तातडीने कठोर शिक्षा करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या माजी नगराध्यक्षा सौ. संगीताताई गोरंट्याल यांनी यावेळी केली.

# अंभोरा पोलीसांची धाडशी कारवाई

**आष्टी । प्रतिनिधी**

अंभोरा पोलीस ठाणे हद्दीतील शिरापूर येथील अमीरभैय्या सय्यद हा आरोपी हर्सूल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे जन्मठेपेची सजा भोगत असताना हा पॅरोल रजेवर आला. पुन्हा तो हजर झाला नाही.या आरोपीचा शोध अंभोरा पोलीस करत असताना अमीरभैय्या सय्यद यास मंगळवार दि.२० ऑगस्ट रोजी एका हॉटेलमधून पोलिसांनी शिताफीने अटक केली.आष्टी पोलीस स्टेशन गु.र.क्र. ०१/१६ कलम ३०२ भा.द.वि.मधील जन्मठेप सुनावण्यात आलेला आरोपी अमीरभैय्या सय्यद (रा.शिरापूर ता. आष्टी) हा सन २०२२ मध्ये पॅरोल रजेवर आल्यापासून फरार होता. त्याचेवर अंभोरा पोलीस स्टेशन गु.र.क्र.१५८/२२ कलम २२४ भा.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. या गुन्ह्यातील आरोपी विरोधात न्यायालयाने अटक वॉरंट जारी केले होते.या अनुषंगाने अंभोरा पोलीस गुप्त बातमीदारामार्फत मिळेलेल्या माहितीच्या अनुषंगाने शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ,अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली अंभोरा पोलीस स्टेशन येथील प्रभारी अधिकारी मंगेश साळवे, पोलीस अंमलदार शिवदास केदार,सुदाम पोकळे, शरद पोकळे रवाना होऊन त्याचेवर ट्रॅप लावला असता तो शिरापूर परिसरातील एका हॉटेलमध्ये बसलेला होता.त्याचवेळी या आरोपीवर झडप टाकुन त्यास ताब्यात घेत अटक करण्यात आली आहे.



बीड : परळी येथे कृषी महोत्सवानिमित्त आलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आमदार प्रकाश सोळंके, जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर चव्हाण यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## हनुमंत धनवडे यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी जवळील हांडेवाडी येथील हनुमंत विठ्ठल धनवडे यांचे दि.१९/०८/२०२४ सोमवार रोजी हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली. त्यांचा शांत,संयमी व सर्वांशी मिळून मिसळून स्वभाव होता.आठ दिवसापूर्वी त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता.उपचारासाठी त्यांना अहमदनगर येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले होते.त्यांच्यावर बायपास शस्त्रक्रिया केली होती.त्यांचा बीपी कमी झाला होता त्यातच त्यांची उपचारादरम्यान दि.१९ ला प्राणज्योत मालवली.मोठ्या कष्टाने व मेहनतीने मुलांना उच्च शिक्षण देऊन शेतीत प्रगती केली होती.त्यांच्याकडे



ट्रॅक्टर असल्याने त्यांचा परिसरात मोठा जनसंपर्क होता.त्यांच्या पार्थिव देहावर त्यांच्या शेतामध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी ह.भ.प.गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज तसेच राजकीय,सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, व्यावसायिक व सर्व स्तरातील नागरिक,नातेवाईक व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी,अविवाहित एक मुलगा, विवाहित मुलगा, एक मुलगी, सून, तीन भाऊ सह मोठा परिवार आहे.

# बदली रद्द करा नसता दाखले द्या, पालकांचा आक्रमक पवित्रा

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

गुरुविना नाही दुजा आधार रडता पडता कोठे आडता तोची नेतसे पार गुरूविना नाही दुजा आधार या अभंगातील गुरू आणि शिष्यातील अतुल प्रेम पहावयास मिळत आहे. असेच नाते मातकुळी येथील शिक्षक आणि विद्यार्थी व पालिकांमध्ये पहावयास मिळाले आहे. येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील सहशिक्षक समीर खेमगर सर यांची प्राथमिक पदवीधर पदी पदोन्नती झाली असून त्यांची जिल्हा परिषदेच्या आष्टी तालुक्यातील कानडी येथे नियुक्ती झाल्याने येथील विद्यार्थी व पालकांमध्ये कमालीची नाराजी झाली असून त्यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी यासाठी माजीमंत्री सुरेश आण्णा धस गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव आणि शाळेचे मुख्याध्यापक सुर्यभान पठाडे यांना निवेदन देऊन साकडे



**शिक्षकाची बदली रद्द करण्यासाठी माजीमंत्री सुरेश धस, गटशिक्षणाधिकारी यादव आणि मुख्याध्यापकाला ग्रामस्थांचे साकडे**

घालण्यात आले आहे.

येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शैक्षणिक वर्ष चालू झाल्यापासून एक शिक्षक कमी असून शाळा कशीबशी चालू असून येथील बरेच विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी आष्टी जामखेड येथील शाळेत जात असून मात्र काही समजुतदार पालकांच्या सहकार्याने शाळा सुरू आहे. येथील गुणवंत शिक्षक समीर खेमगर सर यांची बदली पालकांच्या जिव्हारी लागली असून आम्हाला खेमगर सर येथेच पाहिजेत असा आक्रमक पवित्रा घेतला असून एक तर बदली रद्द करा नाहीतर आमच्या पाल्यांचे दाखले द्या असे निवेदन मुख्याध्यापक पठाडे सर यांना दिले आहे तर माजीमंत्री सुरेश आण्णा धस व गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांना विनंती पालकांनी केली आहे.



## क्रिमिलेयर ॲक्ट लागू करण्याच्या विरोधात दलित, आदिवासी संघटनांचा कडकडीत बंद

**आष्टी । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या अनुसूचित जाती आरक्षणामध्ये क्रीमिलेयर लागू करण्याच्या परवानगीच्या विरोधात दलित-आदिवासी संघटनांनी बुधवारी १४ तासांच्या भारत बंदची हाक दिली आहे.नॅशनल कॉन्फेडरेशन ऑफ दलित अँड ट्रायबल ऑर्गनायझेशनने याला दलित आणि आदिवासींच्या घटनात्मक अधिकारांच्या विरोधात म्हटले आहे.याबाबतचे निवेदन आष्टी तहसिलदार दिले आहे.

आष्टी शहरासह तालुक्यात दिसून येत आहे.आष्टी, कडा,धानोरा,धामणगाव,दौलावडगांव यासह तालुका कडकडीत बंद पाळण्यात आला.आष्टी शहरांमध्ये रॅली काढून,घोषणा देत तहसिलदार बाळदत्त मोरे यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आरपीआई तालुका अध्यक्ष अशोक साळवे,आरपीआई नेते अरुण निकाळजे,माजी नगरसेवक दीपक निकाळजे,युवक रिपाई तालुकाध्यक्ष कुणाल निकाळजे, सुभाष निकाळजे, अविनाश निकाळजे, नितीन निकाळजे,राहुल निकाळजे, सादिक कुरेशी,संदीप जाधव यांच्यासह आष्टी तालुका आष्टी शहरातील सर्व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एससी,एसटी आरक्षणात क्रिमिलियर विरोधात माजलगावात रॅलीद्वारे तहसीलदारांना दिले निवेदन

**माजलगाव । प्रतिनिधी**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गामध्ये क्रिमिलियर लागू करण्याच्या व उपवर्गीकरणआरक्षण लागू करण्याच्या निर्णयाविरोधात संपूर्ण भारतामधील अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय सर्व पक्षीय संघटनांच्या वतीने दिनांक २१ ऑगस्ट २०२४ भारतासह बीड जिल्ह्यात आणि माजलगाव तालुक्यात कोर्टाचा निर्णय मागे घेण्यात यावा व एससी एसटी आरक्षणात क्रिमिलियर लागू करून आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या कोर्टाच्या निर्णयाविरोधात सरकारने कायदा करून हे क्रिमिलीयर लागू करण्याच्या निर्णयाविरोधात वर्गीकरणाच्या कायदा करून मागे घेण्यात यावा या मागणीसाठी सर्व स्वाभिमानी रिपब्लिकन सेना ,वंचित बहुजन आघाडीच्या सर्व पक्षीय संघटनांच्या वतीने मागणीसाठी माजलगाव तालुक्यातील आरक्षण धारक सर्व जातीसमूहाच्या वतीने सर्वपक्षीय माजलगावात शांतता रॅली काढून हे तहसीलदार यांना निवेदन देऊन सरकारने




कायदा करून ही क्रिमिलियर व उपवर्गीकरण मागे घेण्यात यावे या मागणीसाठी आरक्षण धारक जातीसमूहातील अनुसूचित जाती अनुसूचित जमाती वंचित बहुजन आघाडी स्वाभिमानी रिपब्लिकन सेना व सर्वपक्षीय संघटनांच्या वतीने ज्येष्ठ नेते कचरू खळगे,विजय साळवे स्वाभिमानी रिपब्लिकन सेना प्रमुख,धमानंद साळवे ,अंकुश जाधव,भारत तांगडे,भारतीय बौद्ध महासभेचे एस.बी.मोरे गुलाबराव धाईजे, सचिन उजगरे, डॉ. संजय नाकलगावकर तसेच बहुजन समाज पार्टीचे अमोल डोंगरे कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे राहुल टाकणखार प्रा.धम्मानंद बोराडे,राम उदमले, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव

आंदोलनकर्त्यांनी सांगितले याप्रसंगी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष विजय साळवे समयोचित भाषण करताना म्हणाले की कोर्टाच्या माध्यमातून मनोवादी सरकारने या आदेश द्यायला लावून अनुसूचित जाती जमातींच्या आरक्षणामध्ये क्रिमिलियर लागू करून उपवर्गीकरण लागू करण्याच्या घाट घातलेला असून तो सरकारने निर्णय मागे घेण्यासाठी कायदा करून कोर्टाला मागे घ्यायला लावावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आलेली आहे,ज्येष्ठ नेते कचरु खळगे यांची ही समायोजित भाषण झाले वंचित बहुजन आघाडीचे धमानंद साळवे,अंकुश जाधव भारत तांगडे बहुजन समाज पार्टीचे अमोल डोंगरे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेश जाधव सह प्रमुख नेत्यांनी समयोचित भाषणे करून संतोष रुईकर तहसीलदार माजलगाव यांना निवेदन देण्यात आले.

# रक्षाबंधन व संस्कृत दिन कार्यक्रम संपन्न



**माजलगाव । प्रतिनिधी**

श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालय येथे दि.२० ऑगस्ट रोजी रक्षा बन्धन, संस्कृत दिन,नारळी पौर्णिमा हे कार्यक्रम संपन्न झाले. प्रमुख अतिथि म्हणून बोलत असताना प्रभाकर बनसोडे यांनी संस्कृत भाषेतीची महती विद्यार्थ्यांना सांगितली.विभाग प्रमुख रवींद्र खोडवे हे अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की,संस्कृत भाषा ही जगातील अतिप्राचीन भाषा आहे.

भारतीय संस्कृती,संस्कार, ज्ञान-विज्ञान संस्कृत भाषेतच आहेत.संगणका साठी अत्यंत महत्वपूर्ण व उपयोगी संस्कृत भाषाच आहे.इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांनी संस्कृत पोवाडा गीत सादर केले.शरयू तुपकरी या विद्यार्थिनीने संस्कृत भाषाचे महत्व सांगितले.या कार्यक्रमाचे सुंदर नियोजन विजय सोन्नर , प्रास्ताविक कुंडकर सर,आभार मंगेश मुळी .सूत्रसंचालन समृद्धी गायकवाड,ने केले.या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक संतोष लिंबकर,उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे,पर्यवेक्षक सदाशिव ढगे, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्रीमती अपर्णा मुळे व सर्व शिक्षक, शिक्षिका,विद्यार्थी उपस्थित होते.त्याच प्रमाणे विशाल ठोसर ,मंगेश मुळी.पल्लवी कानडे.व शालेय विद्यार्थ्यांनी ग्रामीण रुग्णालय, बस स्टैंड,मूकबधिर निवासी विद्यालय माजलगाव या ठिकाणी जाऊन रक्षा बंधन केले.मुख्याध्यापक संतोष लिंबकर,यांच्या कुशल मार्गदर्शनाने हा कार्यक्रम यशस्वी झाला.


# गोरगरीब रुग्णांना मदत मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर राहणार : पूजा कोथळे

## राष्ट्रवादी काँग्रेस वैद्यकीय मदत कक्षाच्या अंबाजोगाई सह समन्वयकपदी पूजा कोथळे यांची नियुक्ती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रेरणेने सुरु करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस वैद्यकीय मदत कक्षाच्या अंबाजोगाई सह समन्वयकपदी पूजा दिग्विजय कोथळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे येथील पक्षाच्या प्रदेश कार्यालयात पूजा कोथळे यांच्यासह शेकडो महिलांनी राष्ट्रवादी काँग्रेस वैद्यकीय मदत कक्षामध्ये प्रवेश केला. यावेळी प्रदेश अध्यक्ष जितेंद्र सातव यांना राखी बांधून रक्षाबंधनाचा पवित्र सणही साजरा करण्यात आला.

राज्यातील विविध जिल्ह्यात, तालुका व गाव पातळीवर वैद्यकीय मदत कार्य पोहचवणे. नागरिकांनी विविध वैद्यकीय मदत योजनांची माहिती करुन देणे, गोरगरीब आणि गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रेरणेने



आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस वैद्यकीय मदत कक्षाची सुरुवात करण्यात आली. कक्षाची राज्याची जबाबदारी प्रदेशाधायक्ष जितेंद्र सातव यांच्यावर सोपविण्यात आली आहे. या सर्वांच्या सामाजिक करण्याच्या प्रेरणेतून सामाजिक कार्यकर्त्या पूजा दिविजय कोथळे यांच्यासह शेकडो महिलांनी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस वैद्यकीय मदत कक्षामध्ये प्रवेश केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष जितेंद्र सातव यांनी पूजा कोथळे यांची राष्ट्रवादी काँग्रेस वैद्यकीय मदत कक्षाच्या अंबाजोगाई सह समन्वयकपदी नियुक्ती करून त्यांना नियुक्तीपत्र देत पुढील लार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी राज्य सरचिटणीस सचिन सरवदे, राज्य सल्लागार समिती सदस्य सोमाचंद मुथा, राज्य सहविस्तारक भारतीताई तुपे, महिला शहर उपाध्यक्षा नूतन गायकवाड, केदार केळकर, शिवराज सातव उपस्थित होते. पूजा कोथळे यांच्या नियुक्तीचे सराव्त्र स्वागत होत आहे. पूजा कोथळे या सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहिल्याअ आहेत. सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून त्यांनी महिला कार्यकर्त्यांची मोठी फळी तयार केली. त्यांचे कार्य आणि जनसंपर्क याची दाखल घेत पक्षाकडून त्यांच्यावर सह समन्वयक पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे. दरम्यान, पदाच्या माध्यमातून कक्ष वाढीसाठी आणि रुग्ण सेवेसाठी काम करणार असल्याचे पूजा कोथळे यांनी सांगितले. अंबाजोगाई परिसरातील गरजू रुग्णांनी मदतीसाठी ९८६०६९०९६३ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन पूजा कोथळे यांनी केले आहे.

# बदलापूर येथील आरोपीला भर चौकात गोळ्या घाला -राजेंद्र आमटे

## अजून किती निष्पाप आयुष्य उद्ध्वस्त होऊ देणार?

**बीड । प्रतिनिधी**

वासनेच्या अधीन झालेल्या नराधमाने एक नव्हे अनेक लेकीच आयुष्य उद्ध्वस्त केले आहे. एखाद्या निष्पाप मुलीचा बलात्कार, खून, हत्या झाली की आम्ही मेणबत्या पेटवतो, मोर्चे काढतो, बंद हाक देतो पुन्हा दोन चार महिने झाले की शांत होतो आरोपी जमीन करून घेतात पुन्हा रजोस मोकळे फिरतात बलात्कार, खून, यातील आरोपीचे खटले प्रकरण चालवण्यात वेळ न घालवता हाय स्पीड खटले चालवत प्रकरण निकाली काढून तत्काळ आरोपीला भर चौकात गोळ्या घाला. काय होईच ते होऊ ध्या पुन्हा एखाद्या निष्पाप लेकी कडे वाकडी नजर करून पाहण्याची हिम्मत कोणता होणार नाही.



ज्या देशात स्त्री च्या सन्मान साठी रामायणाचे युद्ध महाभारताचे युद्ध झाले त्याच देशात बलात्कार, खून अत्याचार करणाऱ्या नराधमाच्या विरोधात मेणबत्या पेटवतो, कोठे बंद करतो या पेक्षा भर चौकात उभा करून गोळ्या घालाव्यात तेव्हा या देशातील लेकी सुरक्षित राहतील आधी कोलकत्ता व नंतर बदलापूर येथील प्रकार अतिशय दुर्दैवी आहे कायद्याच्या नेबळट पणा मुळे झाला आहे बदलापूर येथील आरोपींना भर चौकात गोळ्या घालाव्यात अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी आघाडी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, अर्जुन सोनवणे, संजय तीपाले, सुधाकर सोनवणे, कृष्णा मसुरे, रमेश जगताप, शैलेश सुरवसे, आदीच्या वतीने आव्हान करण्यात येते आहे

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष



# पोर्शे अपघातावेळी गाडीत दोन नव्हे तर तीन मित्र असल्याचं समोर, गायब झालेला तिसरा 'हायप्रोफाईल' तरुण कोण?

**पुणे । प्रतिनिधी**

कल्याणीनगर पोर्शे अपघात प्रकरणी एक मोठी अपडेट समोर आली आहे. दारू पिऊन गाडी चालवणाऱ्या अल्पवयीन आरोपी सोबत गाडीत दोन नाही तर तीन मित्र असल्याचं समोर आलं आहे. अपघात झाल्यानंतर हा तिसरा तरूण पळून गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्यामुळे तो तिसरा तरूण कोण होता याची आता चर्चा सुरू आहे.



पुण्यातील कल्याणीनगरमध्ये १९ मे रोजी पुण्यातील विशाल अग्रवाल या उद्योगपतीच्या मुलाने दारू पिऊन गाडी चालवली आणि दोघांचा जीव घेतला होता. यावेळी अपघातग्रस्त पोर्शेगाडीमध्ये मागे तीन तरूण असल्याचे स्पष्ट झालं आहे. पोर्शे गाडीत पुढे अल्पवयीन तरुणाच्या शेजारी ड्रायव्हर आणि मागे तीन मित्र असल्याचे तपासातून समोर आलं आहे.

अपघात घडला तेव्हा या तिसऱ्या तरुणाने पळ काढला होता. अल्पवयीन तरुणाच्या दोन मित्रांचे रक्ताचे नमुने देखील ससून रुग्णालयात बदलले गेले होते. या तीनही मुलांनी दारू प्यायल्याचं समोर आलं असून अल्पवयीन आरोपीने दारूच्या नशेत गाडी चालवल्यानेच ही घटना घडली.

पोलिसांनी अल्पवयीन मुलाच्या पालकांसह सात जणांविरुद्ध वेगवेगळ्या प्रकरणात आरोपपत्र दाखल केले आहे. २५ जुलै रोजी पुण्यातील न्यायालयात यासंबंधी ९०० पानांचे आरोपपत्र सादर करण्यात आले. तथापि, त्यात १७ वर्षीय मुलाला वगळण्यात आले, ज्याचा खटला बाल न्याय मंडळ (जेजेबी) स्वतंत्रपणे हाताळत आहे.

पोर्शे कार परत मिळवण्यासाठी अग्रवाल कुटुंबाची न्यायालयात धाव

पुण्यातील धनाढ्य बिल्डर विशाल अग्रवालच्या अल्पवयीन पोराने पुण्यातील कल्याणी नगर परिसरात दोघांना चिरडल्यानंतर संपूर्ण राज्यसह देशभरामध्ये खळबळ उडाली होती. या प्रकरणामध्ये विशाल अग्रवालच्या अल्पवयीन मुलाला जामीन मिळाला असला, तरी अपघातग्रस्त पोर्शे कार अजूनही पोलिसांच्या ताब्यात आहे. त्यामुळे आलिशान कार परत मिळण्यासाठी आता अग्रवाल कुटुंबीयांकडून प्रयत्न सुरू झाले आहेत.

# पुणे-नगर रोड भागात टोईंग व्हॅनद्वारे नो पार्किंगमधील वाहनांवर कारवाईला सुरुवात

**पुणे । प्रतिनिधी**

वाघोली येथे पुणे-नगर महामार्गावर आव्हाळवाडी फाटा ते बाईफ रोड दरम्यान रस्त्याच्या कडेला नो पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दुचाकी वाहनांवर टोईंग व्हॅनद्वारे कारवाई करण्यास लोणीकंद वाहतूक पोलिसांनी सुरुवात केली आहे. पहिल्याच दिवशी जवळपास ३० वाहनांवर टोईंग व्हॅनद्वारे कारवाई करण्यात आली आहे.

पुणे-नगर महामार्गावर वाघोलीत होणारी वाहतूक कोंडी व महामार्गाच्या कडेला दोन्ही बाजूंनी वाहनांची पार्किंग करून महामार्गाने जाणाऱ्या वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने वाघेश्वर चौक ते लाईफलाईन हॉस्पिटलपर्यंत महामार्गाच्या दोन्ही बाजूस नो पार्किंग करण्यात आली आहे. त्याबाबतचे आदेश यापूर्वी काढण्यात आले आहेत. नो पार्किंगचे आदेश असूनही महामार्गाच्या कडेला दुचाकी चारचाकी वाहने बिनधास्त लावली जातात. सदरच्या वाहनांवर पोलीस विभागाकडून दंड आकारला जातो मात्र पार्क केलेल्या दुचाकी पुन्हा त्याचठिकाणी लावल्या जातात. लोणीकंद वाहतूक विभागाने बुधवारी (दि.२१) टोईंग व्हॅनद्वारे कारवाईस सुरुवात करून कारवाई केली आहे. टोइंगची कारवाई यापुढे वाहतूक विभागाकडून सुरु राहणार आहे

# कर भरला नाही ; सरपंचासह दोन सदस्य अपात्र

**पुणे । प्रतिनिधी**

ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत निवडून आलेल्या महिला सरपंच आणि इतर दोन ग्रामपंचायत सदस्यांकडे त्यांच्या मालकीच्या देय मालमत्ता कराचा भरणा करण्याची मागणी करूनही तो त्यांनी मुदतीत जमा केला नसल्याचे सिध्द् झाल्याने या तिघांना सदस्यत्वापासून अपात्र ठरविण्यात आले आहे.

पुणे जिल्ह्यातील परंदवडी (ता. मावळ) ग्रामपंचायतीच्या सरपंच तथा सदस्य अलका दत्तात्रय पापळ, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश शिवराम पापळ आणि दामू गणपत ठाकर अशी अपात्र ठरविलेल्यांची नावे आहेत. अतिरिक्त विभागीय आयुक्त कविता व्दिवेदी (आयएएस) यांनी याबाबत आदेश जारी केले आहेत. जिल्हाधिकार्यांच्या आदेशाला आव्हान देत परंदवडीचे रहिवासी चंद्रकांत भोते आणि भरत भोते यांनी विभागीय आयुक्तांकडे अपिल केले होते. त्याची अंतिम सुनावणी पाच ऑगस्ट रोजी झाल्यानंतर गेल्या मंगळवारी (दि.१३) अपात्रतेचे आदेश सर्व संबंधित विभागांना पाठविण्यात आले आहेत.

# वैज्ञानिक दृष्टिकोन हा डॉ. अभ्यंकर यांच्या जगण्याचा मूलाधार;आदरांजली सभेत आठवणींना उजाळा

**पुणे । प्रतिनिधी**

डॉ. शंतनू अभ्यंकर यांच्या जगण्याचा मूलाधार वैज्ञानिक दृष्टिकोन होता. त्याआधारे किती नावीन्यपूर्ण, समरसून, सर्जनशीलपणे जगता येते, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ. अभ्यंकर होते, अशा शब्दात डॉ. अभ्यंकर यांना आदरांजली वाहण्यात आली.



विज्ञानवादी लेखक, लोकविज्ञान व अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे कार्यकर्ते डॉ. शंतनू अभ्यंकर (वय ६०) यांचे गुरुवारी (ता. १५) प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि अभिवादन करण्यासाठी लोकविज्ञान संघटना, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, लोकविज्ञान मंच, समाजविज्ञान अकादमी यांनी आदरांजली सभेचे बुधवारी (ता. २१) आयोजन केले होते. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आनंद करंदीकर, माजी खासदार प्रदीप रावत, अनिल जोशी, अनंत फडके, अविनाश पाटील, विशाल विमल, डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. विवेक सावंत, शरद अष्टेकर, अजित अभ्यंकर, स्वानंद बेदरकर, कुमार नागे आदी उपस्थित होते.

नागरिक, हितचिंतक, चाहते, साहित्यिक, वाचक, कलाकार, कार्यकर्ते, डॉक्टर्स, अभ्यासक, विचारवंत यांनी त्यांना आदरांजली वाहिली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिताचे कार्याध्यक्ष अविनाश पाटील म्हणाले, ''ग्रामीण समाजजीवन, ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये आरोग्याशी निगडित अंधश्रद्धेविरुद्ध त्यांनी दिलेले योगदान मोलाचे आहे.''

लोकविज्ञानचे डॉ. अनंत फडके म्हणाले, ''अनेक डॉक्टर शिक्षणासाठी पुण्यात आले आणि पुण्यातच स्थायिक झाले. मात्र समाजनिष्ठा, तत्वनिष्ठतेमुळे डॉ. अभ्यंकर यांनी शिक्षण पूर्ण करून वाई येथे आपल्या कामाला सुरुवात केली.'' ''शंतनू अभ्यंकर यांचे राधिका सांत्वन हे नाटक मिळून साऱ्या जनीच्या व्यासपीठावर व्हावे अशी त्यांची खुप इच्छा होती. मात्र हे होवू शकले नाही याचे मला दुखः आहे.'' असे ज्येष्ठ संपादिका गीताली वि. म. यांनी सांगितले. अनिल जोशी म्हणाले ''सर्वसमावेशक विज्ञानवादी पुरोगामी विचाराचे प्रतिभावंत व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. शंतनू अभ्यंकर होते.''

# ऐतिहासिक स्मारकांची स्वच्छता व देखभालीसाठी उद्योजक पुनीत बालन यांचा पुढाकार

**पुणे । प्रतिनिधी**

समाजकार्यात नेहमीच अग्रेसर असलेले युवा उद्योजक पुनीत बालन यांनी जिल्ह्यातील ऐतिहासिक स्मारकांची स्वच्छता आणि देखभाल करण्याची जबाबदारी घेतली आहे. इंद्राणी बालन फाउंडेशन आणि राज्य पुरातत्त्व विभाग यांच्यात यासंबंधीचा करार नुकताच झाला. पुणे जिल्हयातील सिंहगड किल्यावरील छत्रपती राजाराम महाराज समाधी, वढू बुद्रुक येथील स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे समाधी स्थळ, राजगुरुनगर मधील हुतात्मा शिवराम हरी राजगुरुंचे जन्मस्थळ आणि तुळापूर येथील महादेव मंदिर या राज्य संरक्षित स्मारकांचा यामध्ये समावेश आहे. यासर्व ठिकाणी वर्षभर हजारो पर्यटक भेट देत असतात.




सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ही संख्या अनेक पटीने वाढलेली असते. या स्थळांविषयी देशातील नागरिकांच्या मनात एक आस्थेची आणि स्वाभिमानाची भावना आहे.या ठिकाणांची देखभाल होणे आवश्यक असल्याने या स्मारकाची दैनदिन स्वच्छता आणि देखभाल करण्याची तयारी उद्योजक पुनीत बालन यांनी राज्य पुरातत्व विभागाचे सहायक संचालक विलास वाहणे यांच्याकडे पत्राद्वारे दर्शविली होती. पुरातत्व विभागाने त्यास तत्काळ परवानगी दिली.

त्यानुसार यासर्व स्मारकांच्या ठिकाणी सामाजिक संस्था दायित्व योजनेअंतर्गत इंद्राणी बालन फाउंडेशनच्या माध्यमातून सात सुरक्षा रक्षक कर्मचारी नेमण्यात येणार आहे. तसेच या स्मारकाच्या लगतच्या परिसराची दैनदिन स्वच्छता, देखभाल व परीक्षण फाउंडेशनच्या माध्यमातून केली जाणार आहे. याबाबत बोलताना पुरातत्व विभागाचे सहायक संचालक डॉ. वाहणे म्हणाले, 'सामाजिक संस्था दायित्व योजने'अंतर्गत चार संरक्षित स्मारकांचे देखभालीचे दायित्व 'इंद्राणी बालन फाऊंडेशन'च्या वतीने शिवप्रेमी तथा युवा उद्योजक पुनीत बालन यांनी स्वीकारले, त्यांचे कौतुक आणि स्वागत आहे. पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत असलेली राज्य संरक्षित स्मारकाच्या दैनंदिन देखभालीसाठी लोकसहभाग वाढत आहे, ही खुप स्तुत्य बाब आहे. यामुळे स्मारकांची स्वच्छता राखणे व देखभाल करण्यास मदत होईल. आपला वारसा जपण्यासाठी इतरांनीही पुढाकार घ्यायला हवा.

# जागतिक गेमिंग अनुभव व शिक्षण केंद्र स्थापन होणार

**पुणे । प्रतिनिधी**

विश्वकर्मा इन्स्टिट्यूट आणि विश्वकर्मा युनिव्हर्सिटी (व्हीआयव्हीयु) ने झेन्सर टेक्नॉलॉजीजसोबत भागीदारी जाहीर केली. या भागीदारीच्या माध्यमातून गेमिंग एक्सपीरियन्स लर्निंग (जिएक्सएल) नावाचे एक नवीन केंद्र स्थापन केले जाईल. ही नाविन्यपूर्ण भागीदारी व्हीआयव्हीयु आणि झेन्सरला जागतिक गेम डिझाइन आणि विकास क्षेत्रात नेतृत्व निर्माण करण्यासाठी मदत करेल.



गेम विकास उद्योगात क्रांती घडवणे, हे जिएक्सएल केंद्राचे उद्दिष्ट आहे. झपाट्याने विकसित होणाऱ्या उद्योगात यशस्वी होण्यासाठी कुशल गेम डेव्हलपर्सची निर्मिती करणे, उद्योग व्यावसायिकांसाठी उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि विकास कार्यक्रम प्रदान करणे हा याचा उद्देश आहे.

गेमिंग अनुभव आणि शिक्षणासाठी एक अत्याधुनिक केंद्र स्थापन करण्याबरोबरच विशिष्ट प्रशिक्षण आणि संसाधनांद्वारे व्यक्तींना त्यांच्या करिअर आणि शैक्षणिक संधी वाढविण्यासाठी सक्षम करण्यासाठी प्रयत्न होणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे. मार्क विलेट, हेड ऑफ गेम्स पोर्टफोलिओ स्टुडिओ आणि विवेक कुलकर्णी यांच्या नेतृत्वात झेन्सरच्या प्रतिनिधीनी विश्वकर्मा इन्स्टिटयूट आणि विश्वकर्मा युनिव्हर्सिटीच्या प्रमुखांशी चर्चा केली. ज्यात व्हीयूचे कुलपती प्रो. (डॉ.) सिद्धार्थ जाबडे, विश्वकर्मा इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी (व्हीव्हीआयटी) चे संचालक डॉ. विवेक देशपांडे आणि विश्वकर्मा इन्स्टिटयूटचे कॉर्पो रेट रिलेशन्सचे संचालक डॉ. अतुल पी. कुलकर्णी यांचा समावेश होता. आमच्या प्रगतीमध्ये सहभागी व्हा आणि गेमिंगच्या जगात नवी परिभाषा तयार करा, नवीनतम अपडेटसाठी आणि प्रगतीसाठी आमच्या सोशल मीडिया चॅनेल्सला नक्की फॉलो करा, असे आवाहन विश्वकर्मा इन्स्टिट्यूट आणि विश्वकर्मा युनिव्हर्सिटीद्वारे विद्यार्थीवर्गाला करण्यात आले आहे.

# सोशल मीडियाच्या ओळखीतून मुलीवर बलात्कार

**पुणे । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीशी सोशल मीडियावरून ओळख निर्माण करून तिच्यावर बलात्कार करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीने सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यावरून पोलिसांनी आरोपी तरुणाच्या विरुद्ध पोक्सो ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ऑगस्ट २०२३ ते ११ एप्रिल २०२४ या कालावधीत आहे. घडली बलात्कारासह पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुलगी आणि आरोपी तरुणाची ओळख सोशल मीडियाच्या माध्यमातून झाली होती.

काही दिवसांनी त्यांच्यातील संवाद वाढून त्याचे प्रेमात रूपांतर झाले. दरम्यान, पीडित मुलगी ही शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयातून तिचे राहते घरी जात असताना आरोपीने तिला फोन करून त्याच्या राहते घरी बोलवले.मुलगी घरी गेल्यानंतर तिच्यासोबत त्याने जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर आरोपीने पीडित मुलीला त्याच्या दुचाकीवरून तळजाई टेकडीवर फिरावयास नेऊन, त्यानंतर पुन्हा त्याच्या राहते घरी नेऊन मुलीसोबत पुन्हा शारीरिक संबंध केले. त्यामुळे पीडित मुलगी १७ ते १९ आठवड्यांची गरोदर राहिल्याने हा प्रकार समोर आला. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक साळुंखे करत आहेत.

# पिंपरी चिंचवड सायबर सेलची उल्हासनगरमध्ये कारवाई; शेअर मार्केटच्या नावाखाली फसवणूक कराणाऱ्यास अटक

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड सायबर सेलने उल्हासनगर मध्ये कारवाई करत सायबर गुन्ह्यातील एका आरोपीला अटक केली. देहूरोड मधील एका व्यक्तीची ट्रेडिंगच्या बहाण्याने २० लाख २४ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. या गुन्ह्यात मुख्य आरोपींना मदत करणाऱ्या एकाला पोलिसांनी अटक केली आहे.

अजयकुमार किशनलाल आर्या (रा. उल्हासनगर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून आरोपींनी त्यांना व्हॉट्सअप ग्रुपमध्ये घेतले. ग्रुपवरील कंपनीला सेबीची मान्यता असल्याचे खोटे सांगून आरोपींच्या सांगण्याप्रमाणे शेअर ट्रेडींग केल्यास चांगला फायदा मिळवून देण्याचे अमीष दाखविले. शेअर ट्रेडींगच्या नावाने वेगवेगळ्या बँक अकाऊंटवर २० लाख २४ हजार रुपये भरण्यास भाग पाडून फसवणूक केली. याप्रकरणी देहूरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

या गुन्ह्याचा सायबर सेलकडून समांतर तपास सुरू होता. आरोपींनी गुन्हा करण्यासाठी वेगवेगळया बँक अकाऊंटचा वापर केला असल्याचे तपासात दिसून आले. अकाऊंटधारक आरोपी हा उल्हासनगर येथील असल्याची तांत्रिक माहिती प्राप्त झाली. त्यानुसार सायबर सेलचे एक पथक तपासाकरिता उल्हासनगरला पाठविण्यात आले. पोलिसांनी बँक अकाऊंट धारकाचा शोध घेऊ त्यांच्याकडे विचारपूस केली असता त्याने गुन्ह्यात वापरलेले अकाऊंट त्याच्या ओळखीची व्यक्ती अजयकुमार आर्या याला दिल्याचे सांगितले. पोलिसांनी आर्या याला ताब्यात घेतले असता त्याने सुरुवातीला उडवा उडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी त्याला खाक्या दाखविला असता त्याने त्याचा साथीदार परमान साजीद अली खान व निखिल सेलवानी यांच्या सांगण्यावरुन बँक अकाऊंट घेऊन त्याबदल्यात मोबदला घेतला. तसेच स्वतःचे कोटक बँकेतील खात्यावरही फ्रॉड रक्कम घेतल्याचे निष्पन्न झाले. एटीएममधून पैसे काढून इतर दोन आरोपींना दिल्याचेही त्याने सांगितले. आरोपी आर्या याला देहूरोड पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त संदिप डोईफोडे, सहायक आयुक्त डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे, सहायक निरीक्षक प्रविण स्वामी, सिमा मुंढे, उपनिरीक्षक सागर पोमण, पोलीस अंमलदार प्रिया वसावे, अतुल लोखंडे, सौरभ घाटे, दिपक भोसले, नितेश बिचेवार, श्रीकांत कबुले, स्वप्निल खणसे, कृष्णा गवळी, विशाल गायकवाड, बळीराम नवले, अभिजीत उकिरडे यांच्या पथकाने केली आहे.

# शाळांमध्ये मध्ये 'सखी सावित्री' समिती गठीत करा-सीमा सावळे

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या काही काळात देशातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये अल्पवयीन मुला-मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. बदलापूर पूर्वेतील शाळेत घडलेली घटना याचेच एक उदाहरण आहे. ही घटना खूपच धक्कादायक आहे आणि समाजासाठी चिंतेची बाब आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षा ही प्रत्येक शैक्षणिक संस्थेची प्राथमिक जबाबदारी आहे. यासाठी कठोर उपाययोजना तातडीने करणे आवश्यक आहे. १० मार्च २०२२ च्या शासन परिपत्रकानुसार शाळेमध्ये 'सखी सावित्री' समिती गठीत करण्यात यावी, अशी मागणी स्थायी समितीच्या माजी सभापती सीमा सावळे यांनी संस्थाचालकांकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

बदलापूर येथील एका नामांकित शाळेत शिशुवर्गात शिकणाऱ्या साडेतीन वर्षांच्या दोन मुली शाळेत लघुशंकेसाठी जात होत्या. त्यावेळी शाळेतीलच एका कर्मचाऱ्याने या दोघींवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार नुकताच समोर आला. या घटनेबद्दल संताप व्यक्त करत सिमा सावळे यांनी म्हटले आहे की, अशा प्रकारच्या घटनांमुळे




पालकांमध्ये एक भीतीचे वातावरण निर्माण होते आणि ते विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्यास घाबरतात. शाळा ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक पवित्र स्थळ असते, परंतु अशा प्रकारच्या घटनांमुळे ही पवित्रता नष्ट होत चालली आहे. बाल हक्क सुरक्षा कायद्यांतर्गत बालकांच्याच हिताचे / हक्कांचे रक्षण करण्यासाठी राज्य शासनाचे शालेय व क्रीडा शिक्षण विभागाने १० मार्च २०२२ रोजी एक परिपत्रक काढले आहे. त्या अन्वये राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समतामुलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर 'सखी सावित्री' समिती गठित करणेबाबत आदेश दिले आहेत. परंतु प्रत्यक्षात शासनाच्या या आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही हे अत्यंत खेदजनक आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्यावर होणारे लैगिक अत्याचार रोखण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी काही महत्वाच्या उपाययोजना राबविणे गरजेचे, असे मत सिमा सावळे यांनी व्यक्त केले. संस्थेमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पोलिस व्हेरिफिकेशन करणे आवश्यक आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या वर्तनाचे नियमित निरीक्षण करणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येक शाळेत मुला-मुलींच्या सुरक्षेसाठी एक प्रभावी सुरक्षा यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. यात उउढत कॅमेरे लावणे, सुरक्षारक्षक नियुक्त करणे आणि विद्यार्थ्यांना लैंगिक शोषणाविषयी जागरूक करणे यासारखे उपाय महत्वाचे आहे. शाळेत एक प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. जेणेकरून कोणत्याही प्रकारची तक्रार आल्यास त्याची त्वरित दखल घेतली जावी आणि दोषी व्यक्तीवर कारवाई केली जावी. शाळेने पालकांशी नियमित संपर्क साधला पाहिजे आणि मुलांशी संबंधित कोणतीही समस्या असल्यास त्यांच्याशी चर्चा करावी, अशी आग्रही मागणी सिमा सावळे यांनी विविध संस्थांकडे प्रत्यक्ष भेटून केली आहे.

# शरद मोहोळ खून प्रकरणातील आरोपींचे डिफॉल्ट जामिनाचे अपील उच्च न्यायालयाने फेटाळल

**पुणे । प्रतिनिधी**

कुख्यात गुंड शरद मोहोळ खून प्रकरणातील आरोपींनी डिफॉल्ट जामिनासाठी केलेले अपील मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळले. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती भारती डोंगरे व मंजूषा देशपांडे यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला.





आरोपी साहिल ऊर्फ मुन्ना पोळेकर व इतरांनी मोक्का विशेष न्यायाधीश व्ही. आर कचरे यांच्या दोषारोपत्राला मुदतवाढ व जामीन नामंजूर केल्याच्या आदेशाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी अपील दाखल केले होते.

आरोपींनी विशेष न्यायालयात सरकार पक्षाने दोषारोपपत्र मुदत वाढीसाठी दिलेला अर्ज हा कायदेशीर व सयुक्तिक नाही, अशी भूमिका घेत डिफॉल्ट जामिनासाठी अर्ज केला होता. विशेष सरकारी वकील यांनी दोषारोपपत्र दाखल करण्यास मुदत वाढीसाठी दिलेला अर्ज हा कायदेशीर असून, त्यामध्ये कुठलीही संदिग्धता नाही, असे त्यात नमूद होते. दोषारोपपत्रात दाखल करण्यासाठीच्या मुदतवाढीच्या अर्जात नमूद केलेले मुद्दे हे सयुक्तिक आहेत. तपास अधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या अर्जात मुदतवाढीस दिलेली कारणे व केलेला तपास योग्य असल्याचे सांगून विशेष न्यायाधीश व्ही. आर कचरे यांनी दोषारोपपत्र मुदतवाढीवरील आदेशामध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला होता. तसेच आरोपीचा डिफॉल्ट जामिनासाठी केलेला अर्ज देखील फेटाळला. या आदेशाविरुद्ध आरोपीने उच्च न्यायालयात फौजदारी अपील दाखल केले होते. मोक्का विशेष न्यायालयात सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील ड. प्रमोद बोंबटकर हे काम पाहत आहेत. तसेच मुंबई उच्च न्यायालयात सरकारच्यावतीने एच. एस. वेनेगांवकर यांनी काम पाहिले.